सत्यमेव जयते

अनुसूचित जमाती कल्याण समिती

(२०१७-२०१८)

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

अपर आयुक्त, आदिवासी विकास कार्यालय, ठाणे या कार्यालयातील अनुसूचित जमातीचे अधिकारी/कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच उक्त कार्यालयांतर्गत येणा-या शासकीय यंत्रणा व एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयामार्फत आदिवासी उपयोजना क्षेत्रात राबविण्यात येणा-या कल्याणकारी योजनांबाबतचा

अकरावा अहवाल

(हा अहवाल विधानसभा/विधानपरिषद सभागृहाला दिनांक जून, २०१९ रोजी सादर करण्यात आला.)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

विधान भवन, मुंबई.

जून, २०१९

अनुसूचित जमाती कल्याण समिती

(२०१७-२०१८)

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

अपर आयुक्त, आदिवासी विकास कार्यालय, ठाणे या कार्यालयातील अनुसूचित जमातीचे अधिकारी/कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच उक्त कार्यालयांतर्गत येणा-या शासकीय यंत्रणा व एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयामार्फत आदिवासी उपयोजना क्षेत्रात राबविण्यात येणा-या कल्याणकारी योजनांबाबतचा

अकरावा अहवाल

एचबी ४४२–१

अनुसूचित जमाती कल्याण समिती

(२०१७-२०१८)

समिती प्रमुख

* (१) प्रा. डॉ. अशोक उईके, वि.स.स.

सदस्य

(२) श्री. प्रभुदास भिलावेकर, वि.स.स.

(३) श्री. पास्कल धनारे, वि.स.स.

(४) श्री. संजय पुराम, वि.स.स.

(५) डॉ. पंकज भोयर, वि.स.स.

(६) श्री. राजाभाऊ वाजे, वि.स.स.

(७) श्री. शांताराम मोरे, वि.स.स.

(८) श्री. अमित घोडा, वि.स.स.

(९) डॉ. संतोष टारफे, वि.स.स.

(१०) श्री. वैभव पिचड, वि.स.स.

(११) श्री. पांडुरंग बरोरा, वि.स.स.

(१२) श्री. गोपीकिसन बाजोरिया, वि.प.स.

(१३) श्री. आनंद ठाकूर, वि.प.स.

(१४) श्री. चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.

(१५) श्री. श्रीकांत देशपांडे, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

(१) श्री. जितेंद्र भोळे, सचिव (का.)

(२) श्री. राजेश तारवी, उप सचिव,

(३) श्री. संजय कांबळे, अवर सचिव (समिती),

(४) श्री. दामोदर गायकर, कक्ष अधिकारी.

* प्रा. डॉ. अशोक उईके, समिती प्रमुख, यांची दिनांक १६ जून २०१९ रोजी मंत्रिमंडळात मंत्री म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

अनुक्रमणिका

अनु-क्रमांक (१)	विषय (२)	पृष्ठ क्रमांक (३)
	प्रस्तावना	(सात)
(१)	अपर आयुक्त, आदिवासी विकास कार्यालय, ठाणे	१
(२)	बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त	३१

प्रस्तावना

मी, अनुसूचित जमाती कल्याण समितीचा समिती प्रमुख, समितीने अधिकार दिल्यावरून समितीचा अकरावा अहवाल सभागृहास सादर करीत आहे.

सन २०१७-२०१८ या कालावधीतील अनुसूचित जमाती कल्याण समितीने दिनांक २९ नोव्हेंबर, २०१७ रोजी अपर आयुक्त, आदिवासी विकास कार्यालय, ठाणे येथे भेट देऊन बैठक घेण्यात आली होती. उक्त बैठकीत अपर आयुक्त कार्यालय, ठाणे व त्याअंतर्गत येणा-या एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प या कार्यालयातील अनुसूचित जमातीचे अधिकारी व कर्मचारी वर्गाची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच शासकीय व जिल्हा परिषद यंत्रणेमार्फत आदिवासी उपयोजना क्षेत्रांतर्गत अनुसूचित जमातीच्या लोकांसाठी राबविण्यात येणा-या प्रकल्पांना भेटी देऊन पाहणी केली. उक्त बैठकीत झालेल्या चर्चेच्यावेळी समितीला दिलेल्या आश्वासित मुद्यांच्या अनुषंगाने समितीने दिनांक १ नोव्हेंबर २०१८ रोजी अपर आयुक्त कार्यालयासंदर्भात मंत्रालयीन विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने विचार विनिमय करून त्यासंदर्भात नोंदविलेले अभिप्राय व शिफारशी या अहवालात समाविष्ट केल्या आहेत.

मंत्रालयीन विभागीय सचिवांनी तसेच संबंधित अधिका-यांनी समितीस माहिती देऊन केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांची आभारी आहे.

समितीने दिनांक ११ जून, २०१९ रोजीच्या बैठकीत प्रारुप अहवाल विचारात घेऊन संमत केला.

प्रा. डॉ. अशोक उईके,
समिती प्रमुख,
अनुसूचित जमाती कल्याण समिती.

विधान भवन :
मुंबई,
दिनांक : ११ जून, २०१९.

अहवाल

अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे

अनुसूचित जमाती कल्याण समितीने दिनांक २९ नोव्हेंबर, २०१७ रोजी कै. डॉ. काशिनाथ घाणेकर सभागृह, ठाणे येथे बैठक घेतली. उपरोक्त बैठकीत अप्पर आयुक्त कार्यालय, ठाणे या कार्यालयांतर्गत येत असलेल्या प्रकल्प कार्यालयांतील अनुसूचित जमाती प्रवर्गातील कर्मचा-यांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच अनुसूचित जमाती प्रवर्गातील अधिकारी/कर्मचारी यांची जात पडताळणी, आदिवासी उपयोजना क्षेत्रात राबविण्यात येणा-या योजना आणि आदिवासी विकास महामंडळ व शबरी विकास महामंडळ यांच्या संदर्भात संबंधित अधिका-यांसमवेत आढावा घेतला. माननीय समिती प्रमुखांनी अनुसूचित जमाती कल्याण समिती विषयी माहिती विशद केली. दिनांक ११ ऑगस्ट, १९७९ रोजी महाराष्ट्र विधानमंडळाची अनुसूचित जमाती कल्याण समिती ही स्वतंत्र समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीच्या कार्यकक्षेत अनुसूचित जमातीवर होत असलेला अन्याय, अत्याचार व भारताच्या संविधानातील अनुच्छेद ३३५ मधील तरतूदी अन्वये अनुसूचित जमातीच्या सर्वांगीण विकासासाठी शासनाने ज्या सोयी-सवलती उपलब्ध करुन दिलेल्या आहेत त्या प्रत्यक्षात त्यांना मिळतात किंवा नाही याची माहिती त्यासंबंधी शासनाकडून केली जाणारी उपाययोजना तसेच या समाजाच्या प्रत्येक क्षेत्रातील मागासलेपणा दूर करण्यासाठी करावयाचे प्रयत्न व शासनाकडून राबविल्या जाणा-या कल्याणकारी योजनांसंबंधी विचार विनिमय करून शासनास योग्य त्या शिफारशी करणे, तसेच या कार्यालयातील व शासकीय अनुदानावर चालविल्या जाणा-या इतर संस्था यांना शासनाने ठरवून दिलेल्या टक्केवारीप्रमाणे आरक्षण, भरती, बढती, अनुशेष व जात पडताळणी विषयक बाबी तसेच आदिवासी उपयोजना क्षेत्राअंतर्गत अनुसूचित जमातीच्या लोकांसाठी राबविण्यात येणा-या केंद्र व राज्य शासनाच्या योजनावर विभागनिहाय अप्पर आयुक्त, प्रकल्प अधिकारी व महामंडळाच्या संबंधित अधिका-यांना एकूण प्राप्त झालेला निधी व त्यापैकी झालेला खर्च योग्यप्रकारे करण्यात आलेला आहे किंवा नाही, याचा देखील आढावा घेत असते.

समितीने, आदिवासी विकास विभागात प्रकल्प अधिकारी पदावर पूर्ण वेळ आय. ए. एस. अधिकारी कार्यरत नसल्याने ते आजच्या बैठकीस उपस्थित राहीले नाहीत. त्यांच्याकडे अतिरिक्त कार्यभार दिल्यामुळे विभागाचे कामकाज पार पाडणे अडचणीचे ठरत आहे. म्हणून

प्रकल्प अधिकारी पदावर पूर्ण वेळ अधिकारी असावा, कारण हा आदिवासींच्या जिव्हाळयाचा विषय आहे. आयएएस असलेले प्रकल्प अधिकारी पूर्णवेळ तेथे कार्यरत असले पाहिजेत आदिवासींचा अतिसंवेदनशील भाग, कुपोषण व ग्रामीण भाग यामुळे ठाणे विभागातील दोन्ही प्रकल्प अधिका-यांनी पूर्णवेळ काम करणे गरजेचे आहे. परंतु आयएसएस प्रकल्प अधिकारी हे एसडीएम म्हणून महसूल विभागाचे देखील अतिरिक्त काम करतात. आदिवासी लोकांना अधिका-यांकडे काही काम असेल तर प्रश्न पडतो की, हे अधिकारी कोणत्या कार्यालयात उपस्थित असतील. अधिकारी महसूल कार्यालयात बसले असतील तर ते आदिवासी विभागाचे प्रश्न सोडवित नाहीत. यामुळे लोकांना फारच हाल अपेष्टा सहन कराव्या लागतात. या अधिका-यांनी वेळोवेळी शाळा व कामांना भेटी दिल्या पाहिजेत. त्यांच्याकडे दोन दोन विभागाचा कार्यभार असल्यामुळे ते वेळ देऊ शकत नाहीत. त्यामुळे प्रकल्प अधिकारी पदावर पूर्णवेळ अधिकारी असणे अत्यंत गरजेचे आहे.

अपर आयुक्त कार्यालयातील कर्मचा-यांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेषः-

समितीने, अपर आयुक्त कार्यालय, ठाणे अंतर्गत सरळसेवा वर्ग-३ च्या अनुसूचित जमाती करिता मंजूर असलेल्या १३५ पदांपैकी ३६ पदे रिक्त राहण्याची कारणे, तसेच सदर पदे किती कालावधीपासून रिक्त आहेत. अशी विचारणा केली असता अपर आयुक्तांनी विदित केले की, अनुसूचित जमातीची ३६ रिक्त पदे पेसा व नॉन पेसा क्षेत्रातील असून पेसा क्षेत्रामध्ये माननीय राज्यपाल यांच्या आदेशानुसार स्थानिक आदिवासींमधूनच ही पदे भरणे आवश्यक आहे. या पदांकरीता सन २०१५ मध्ये जाहिरात प्रसिध्द केली होती. याबाबत उच्च न्यायालयात भरती प्रक्रियेला आव्हान दिले गेले असल्याने या भरती प्रक्रियेस सध्या स्थगिती असल्याने सदर पदे रिक्त आहेत.

समितीने, उप लेखापाल १ पद, वरिष्ठ लिपिक २ पदे, लिपिक टंकलेखक/टंकलेखक/ अन्वेषक या पदाची ५ पदे रिक्त आहेत, ही पदे केव्हापासून रिक्त आहेत असे विचारले असता अपर आयुक्तांनी विदित केले की, उपलेखा पाल हे पद कर्मचा-यांच्या राजीनाम्याने रिक्त झाले असून इतर पदे निवृत्त झाल्यामुळे, राजीनामा दिल्यामुळे तसेच काही कर्मचारी मयत झाल्यामुळे रिक्त झाली आहेत. दिनांक १९ फेब्रुवारी, २०१४ रोजी लिपिक टंकलेखक संवर्गाची ९४ पदे भरण्यासाठी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती, त्यानुसार ८६ उमेदवार पात्र झाले होते, अंतिमतः निवड यादीनुसार ८६ उमेदवारांना कागदपत्रे पडताळणीकरिता बोलाविण्यात आले होते, त्यातील फक्त ५९ उमेदवार कागदपत्रे

पडताळणीकरिता उपस्थित राहिले होते, त्या सर्व ५९ उमेदवारांना नियुक्ती आदेश देण्यात आले होते, मात्र त्यापैकी फक्त ४६ उमेदवार नियुक्तीच्या ठिकाणी रूजू झाले आणि ८ उमेदवारांनी राजीनामे दिले असून ३८ उमेदवार सेवेत आहेत.

समितीने, अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे या कार्यालयांतर्गत माध्यमिक शिक्षक-१, उच्च माध्यमिक शिक्षक-३ आणि प्राथमिक शिक्षक-२२ अशी एकूण २६ पदे तसेच चित्रकला, क्रिडा शिक्षकांची पदे रिक्त आहेत. उक्त पदे केव्हापासून रिक्त आहेत तसेच ही पदे रिक्त राहण्याची कारणे विचारली असता अपर आयुक्तांनी विदित केले की, सन २०१५ मध्ये पेसा क्षेत्रामध्ये शिक्षक संवर्गासाठी जाहिरात प्रसिध्द केली होती. यामध्ये जव्हार, डहाणू, शहापूर आणि घोडेगाव या भागांतील अनुसूचित जमाती प्रवर्गाची ही पदे भरावयाची होती. परंतु उक्त भरती प्रक्रियेवर बंदी आल्यामुळे ही पदे भरता आली नाहीत. आता बिगर आदिवासी क्षेत्रातील पदे भरण्यासाठी जाहिरात प्रसिध्द केली आहे. बिगर आदिवासी क्षेत्रातील जाहिरातीमध्ये आरक्षणाच्या टक्केवारीनुसार अनुसूचित जमातीच्या पदांचा सुध्दा समावेश आहे. तसेच केवळ इंग्रजी माध्यमांच्या आश्रमशाळांमध्ये चित्रकला आणि क्रीडा शिक्षकांची नियुक्ती केलेली आहे..

यावर समितीने, केवळ इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्येच चित्रकला आणि क्रीडा शिक्षकांची नियुक्ती करणे योग्य आहे काय? इंग्रजी माध्यमांप्रमाणेच मराठी माध्यमांच्या आश्रमशाळांमध्ये सुध्दा चित्रकला आणि क्रीडा शिक्षकांची नेमणूक केली पाहिजे.

समितीने, अधीक्षक (स्त्री) संवर्गातील २ पदे लघुटंकलेखक १ पद, लिपिक-टंकलेखक ३ पदे व कनिष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी ४ पदे रिक्त आहेत. ही पदे रिक्त राहण्याची कारणे काय आहेत असा प्रश्न केला असता अपर आयुक्तांनी सांगितले की, प्रत्येक आश्रमशाळेच्या वसतीगृहात स्त्री अधीक्षकांची भरती केली आहे. पूर्वी मानधन तत्त्वावर स्त्री अधीक्षक यांना कामावर घेतले जात होते. मानधन तत्त्वावर कार्यरत असलेल्या अनुसूचित जमाती प्रवर्गातील दोन उमेदवारांना सेवेत सामावून घेण्यासंदर्भात शासनाकडे मार्गदर्शन मागविले आहे. शासनाने मानधन तत्त्वावरील उमेदवारांना सामावून घेण्याचे आदेश दिले तर त्यांना सामावून घेण्यात येईल. परंतु मानधन तत्त्वावरील अधीक्षकांना सामावून घेण्यास नकार दिला तर प्रतिक्षा यादीवरील उमेदवारांना नियुक्ती आदेश देण्यात येतील. यासाठी सरळसेवा भरतीची प्रतिक्षा यादी देखील तयार करुन ठेवलेली आहे. तसेच लघुटंकलेखकाचे एक पद, लिपिक-टंकलेखक ३ पदे व कनिष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी यांची ४ पदे

आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हताधारक उमेदवार न मिळाल्याने सदरहू पदे ३ वर्षांपासून रिक्त आहेत.

समितीने, पदोन्नतीची रिक्त असलेली पदे भरण्यास उमेदवार मिळत नसल्यास संबंधित कर्मचा-यास योग्य ते प्रशिक्षण घेण्याबाबत मार्गदर्शन करण्यात यावे. सर्व प्रकल्प अधिका-यांना याबाबत सूचना देण्यात याव्यात. पदोन्नती समितीची वेळोवेळी बैठक घेऊन कार्यवाही केली असती तर पदोन्नतीची पदे भरली गेली असती असे लक्षात आणले असता सन २०१५ मध्ये करण्यात आलेल्या भरती प्रक्रियेस उच्च न्यायालयाने स्थगिती दिली होती. या पदावर पदोन्नती दिली असती तर शिक्षकांची पदे कमी झाली असती. शैक्षणिक प्रगतीवर त्याचा विपरीत परिणाम झाला असता. शाळेमध्ये शिकविण्याकरिता शिक्षकांची गरज जास्त प्रमाणात आहे. म्हणून कदाचित त्यावेळी पदोन्नतीची प्रक्रिया केली गेली नाही असे अपर आयुक्तांनी अवगत केले.

कर्मचा-यांची बिंदूनामावली व जातपडताळणी प्रमाणपत्राबाबतः

समितीने, प्रकल्प कार्यालय, डहाणू येथील अनुसूचित जमातीच्या उमेदवारांची बिंदू नामावली नोंदवही सन २०१४ पासून न तपासण्याची कारणे काय आहेत, तसेच, प्रकल्प कार्यालय, पेण, घोडेगाव, मुंबई व सोलापूर येथील प्रकल्प कार्यालयातील बिंदूनामावलीची तपासणी केव्हापासून करण्यात आलेली आहे. याबाबत विचारणा केली असता उप संचालकांनी विदित केले की, सन २००३, २००५, २००९, २०११ व २०१७ मध्ये बिंदू नामावली नोंदवही तपासणी करण्यात आल्या आहेत. दिनांक १७ एप्रिल, २०१७ रोजी तपासणी करण्यात आलेली आहे. यावर सहायक आयुक्त (मावक) यांनी दिनांक १३ मे, २०१४ पासून बिंदू नामावली नोंदवही तपासलेली नसल्याचे समितीस अवगत केले.

सहआयुक्त तथा उपाध्यक्ष यांनी, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, ठाणे येथे अपर आयुक्त, कार्यालय व त्यांच्या अधिनस्त असलेली प्रकल्प कार्यालये यांची सन २०१४ ते सन २०१७ मध्ये एकूण ४२ प्रकरणे प्राप्त होती. सदर ४२ प्रकरणांमध्ये निर्णय दिलेला आहे. सध्या अपर आयुक्त कार्यालय किंवा त्यांच्या अधिनस्त असलेली प्रकल्प कार्यालये यांची कोणतीही प्रकरणे आपल्याकडे प्रलंबित नाहीत. ही सर्व ४२ प्रकरणे वैध आहेत.

सर्वोच्च न्यायालयाने जात अवैध ठरलेल्या वैधता प्रमाणपत्रांची वेगळी तपासणी करावी, असे समितीने सूचविले असता सह आयुक्तांनी विदित केले की, एखाद्या घरात पूर्वी जात वैधता प्रमाणपत्र दिले असेल, त्यांच्या रक्त संबंधातील नातेवाईकांना जातवैधता प्रमाणपत्र देण्यात यावे. एका प्रकरणात नागपूर खंडपीठाने निर्णय देऊन म्हटले आहे की, पूर्वीचे जात वैधता प्रमाणपत्र फ्रॉड करुन दिले असेल तर त्याचा आढावा घेऊ शकता. मात्र रितसर प्रक्रिया पूर्ण करुन जात वैधता प्रमाणपत्र दिले असेल तर त्याच्या घरातील दुस-या सदस्यांना किंवा रक्त संबंधातील इतर नातेवाईकांना जात वैधता प्रमाणपत्र देणे बंधनकारक आहे.

अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांच्या वसतीगृहाबाबत :

शहापूर येथील १००० मुले व ५०० मुलींची क्षमता असलेली वसतीगृहे व मिरा-भाईंदर येथील वसतिगृह सुरू न होण्याची कारणे काय आहेत? वसतीगृह सुरू नसल्याने विद्यार्थ्यांची कोणत्या ठिकाणी व्यवस्था करण्यात आली आहे? असा प्रश्न उपस्थित केला असता, प्रकल्प अधिका-यांनी सांगितले की, या जागेवर मिरा-भाईंदर महानगरपालिकेने बांधकाम करण्याच्या अटीवर आपणास जमीन दिली होती. ही जागा ४२०० चौरसमीटर आहे. बांधकामाचे टेंडर काढल्यानंतर काही अडचणी निर्माण झाल्या आहेत. ही जागा सन २०१२-१३ मध्ये आपल्याकडे महानगरपालिकेने वर्ग केली.

यावर समितीने, आदिवासी विकास विभागाला दिलेली जागा विनावापर तशीच पडून असल्याने ती जागा पुन्हा महानगरपालिकेला ावर्ग करावी, असा प्रस्ताव आहे. जागेची किंमत जवळपास ६०-७० कोटी रुपयांची आहे. आदिवासी मुले शहरात शिकूच नयेत, अशी अधिका-यांची मानसिकता असेल तर ते योग्य नाही. यासाठी आपला आदिवासी विभागच जबाबदार आहे, असे समितीने मत व्यक्त केले असता प्रकल्प अधिका-यांनी विदित केले की, आदिवासी विकास विभागाच्या बांधकाम विभागाकडून अंदाजपत्रक करावे लागेल. आदिवासी विकास विभागाचा बांधकाम विभाग सन २०१२-१३ मध्ये निर्माण झाला, तेव्हा मनपाने निर्णय घेतला की, आम्ही बांधकाम करणार नाही, आदिवासी विकास विभागाच्या बांधकाम विभागाने बांधकाम करावे. सदर विषयाच्या बाबतीत शासन दरबारी बैठक झाली असता, आपल्या विभागाचे अधीक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता यांनी जागेवर जाऊन पाहणी करावी असे ठरविण्यात आले आहे.

कार्यकारी अभियंत्यांनी पुढे विदित केले की, सदरचे बांधकाम मनपाकडून आमच्याकडे या वर्षाच्या जून महिन्यात आले आहे, बांधकामाच्या इतर प्रक्रिया पूर्ण करून येत्या मार्च महिन्यापर्यंत निविदा कार्यवाही सुरू होईल. वसतीगृहाचे बांधकामाचे क्षेत्र सुमारे १,८०० चौरस मीटर असून डीएसआरनुसार अंदाजपत्रक २० कोटी रुपयांचे लागणार आहेत.

समितीने, संशोधन सहायक म्हणून जे पद आहे त्याचे नेमके स्वरूप काय, तसेच इतर पदांची सद्यःस्थिती काय आहे अशी विचारणा केली असता, अपर आयुक्तांनी विदित केले की, सदर पद हे नियोजनाचे पद आहे. प्रकल्प कार्यालयात ते योजनेचे नियोजन करतात. प्रत्येक प्रकल्प कार्यालयात त्यांची नियुक्ती असते. जिल्हा नियोजन समितीमार्फत जे आराखडे तयार होतात, त्यासंबंधीची माहिती तयार करणे, आराखडे तयार करणे, इतर विभागाकडून आलेली सर्व माहिती, खर्चाची माहिती गोळा करणे, असे त्या पदाचे स्वरुप आहे.

यावर समितीने, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेत अधिका-यांची संख्या खूप कमी आहे. राज्यात सातत्याने पदांच्या संदर्भातील प्रश्न समोर येत आहेत. शासनाच्या वेगवेगळ्या समित्या काम करीत आहेत, मात्र काम करताना कर्मचारी व अधिकारी यांची कमतरता भरून निघाली पाहिजे, या दृष्टीने हा प्रश्न उपस्थितीत होणे अत्यंत आवश्यक आहे.

अनुसूचित जमातीच्या इंग्रजी माध्यमाच्या शाळाबाबतः

समितीने, ठाणे प्रकल्प कार्यालयाअंतर्गत इंग्रजी माध्यमांच्या किती आश्रमशाळा आहेत, या शाळांचे बांधकाम, पुरविण्यात येणा-या सोयी-सुविधा व विद्यार्थी पटसंख्या याबाबतची सविस्तर माहिती देण्यास सांगितले असता, अपर आयुक्तांनी खालील माहिती दिली. सावरोली आणि घोडेगांव या ठिकाणी इंग्रजी माध्यमांच्या आश्रमशाळा आहेत. यापैकी घोडेगाव आश्रमशाळेचे बांधकाम मार्च-२०१८ पर्यंत पूर्ण होईल. सावरोली आश्रमशाळा इयत्ता १ ली ते इयत्ता १० वी पर्यंत मंजूर आहे. सावरोली येथील आश्रमशाळा भाड्याच्या इमारतीमध्ये आहे. उक्त आश्रमशाळेच्या नवीन इमारतीचे बांधकाम सुरू आहे. पुढील शैक्षणिक वर्षापासून सदरहू आश्रमशाळा नवीन इमारतीमध्ये स्थलांतरित होईल. उक्त आश्रमशाळांमध्ये नवीन फर्नीचर तसेच, गाद्या, डेस्क-बेंच, बेड तसेच अशा इत्यादी वस्तू खरेदी करण्याचे टेंडर काढलेले आहे. ज्या वस्तूंची खरेदी करावयाची आहे, त्या वस्तूंचे

नमुने प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविलेले आहेत. सन्माननीय सदस्यांनी सुचविल्यानुसार येत्या शैक्षणिक वर्षांपासून विद्यार्थ्यांना आवश्यक त्या सर्व सुविधा पुरविण्यात येतील. केवळ नवीन इमारतींमध्येच या वस्तू उपलब्ध करून देण्यात येतील असे नाही तर जेथे शक्य असेल त्या जुन्या इमारतींमध्ये सुध्दा या वस्तू उपलब्ध करून देण्यात येतील.

समितीने अपर आयुक्त, ठाणे कार्यालयांतर्गत येणा-या ४ आश्रमशाळा बंद असण्याची कारणे काय आहेत, अशी विचारणा केली असता, प्रकल्प अधिका-यांनी विदित केले की, डहाणू प्रकल्प कार्यालयांतर्गत २ आश्रमशाळा मंजूर होत्या. किरत खरडी या आश्रमशाळेमध्ये विद्यार्थी संख्या पुरेशी नव्हती. तसेच पेण येथील आश्रमशाळेमध्ये सुध्दा विद्यार्थी संख्या कमी होती. त्यामुळे त्या आश्रमशाळा बंद कराव्या लागल्या.

समितीने, खुडेद (तालुका विक्रमगड) येथील आश्रमशाळेला भेट दिली त्यावेळी शाळेत केवळ १२ विद्यार्थी होते, पण शिक्षक मात्र १४ होते. खुडेद येथे स्थलांतरित झालेली आश्रमशाळा कोणत्या संस्थेची आहे? या आश्रमशाळेच्या ठिकाणी पुरेशी विद्यार्थी संख्या नसताना सुध्दा त्या संस्थेला शासनाकडून अनुदान वितरित करण्यात आले आहे काय? अशी विचारणा केली असता, अपर आयुक्तांनी विदित केले की, समितीने भेट दिल्यानंतर त्या आश्रमशाळेला आजतागायत अनुदान वितरित केलेले नाही. ही आश्रमशाळा श्री. अण्णासाहेब जाधव यांच्या संस्थेमार्फत चालविली जाते. उंबरे येथील आश्रमशाळा कुडीत येथे स्थलांतरित करण्यात आली आहे.

यावर समितीने, ज्यावेळेस भेट दिली होती त्या भेटीच्या वेळी निदर्शनास आले होते की, उंबरे आश्रमशाळेकडून विद्यार्थ्यांची योग्य ती काळजी घेण्यात आलेली नव्हती. किंबहुना, त्या आश्रमशाळेमध्ये पुरेसे विद्यार्थीच नव्हते. बाहेरुन येणा-या (डेस्क स्कॉलर) विद्यार्थ्यांना आश्रमशाळेतील विद्यार्थी म्हणून बसविले होते. त्या संस्थेकडून विद्यार्थ्यांना कसल्याच सुविधा पुरविल्या जात नव्हत्या. समितीच्या भेटीच्या वेळी हा संपूर्ण प्रकार निदर्शनास आल्यानंतर समितीने त्याच दिवशी उक्त शाळेचे संपूर्ण अनुदान थांबविण्याचे निदेश दिले. कालांतराने त्या संस्थेने आश्रमशाळा स्थलांतरित करण्याचा प्रस्ताव सादर केला. त्या शाळेमध्ये केवळ १२ मुले असूनही १४ शिक्षक होते. त्या आश्रमशाळेकडून विद्यार्थ्यांची काळजी घेतली जात नसल्यामुळे त्या आश्रमशाळेला अनुदान देता कामा नये. संस्थेने समितीची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला.

समितीने, अपर आयुक्त, ठाणे अंतर्गत आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांना कोणकोणत्या भौतिक (शालेय इमारत, वसतिगृह इमारत, शौचालय, स्नानगृह, पाणी इ.) व शैक्षणिक सुविधा, मध्यवर्ती स्वयंपाकगृह याबाबत प्रकल्प कार्यालय तसेच अपर आयुक्त कार्यालय स्तरावर कशाप्रकारे पाहणी केली जाते? मागील ३ वर्षांत किती अनुदानित आश्रमशाळांना भेटी देण्यात आलेल्या आहेत? या भेटीमध्ये कोणत्या त्रुटी आढळून आल्या आहेत? याबाबत खुलासा करण्यास सांगितले असता, अपर आयुक्तांनी विदित केले की, सहायक प्रकल्प अधिकारी, प्रकल्प अधिकारी, तसेच अपर आयुक्त कार्यालयामार्फत दरवर्षी डिसेंबरमध्ये याचे परिक्षण करण्यात येते. त्या निमित्ताने संपूर्ण तपासणी केली जाते. या आधारे त्यांचा नियतव्यय, अनुदान किती द्यायचे ते ठरते. या तपासणीच्या वेळी आवश्यक असलेल्या सर्व सोयी सुविधांची तपासणी केली जाते. शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांमागे ४ हजार रुपयांच्यावर खर्च येत असतो.

यावर समितीने, मुंजेगावच्या शाळेत मध्यवर्ती स्वयंपाकगृह आहे. यामध्ये मुलांच्या जेवनाला २ हजार रुपये खर्च येतो. मात्र तेथे मुलभूत सुविधा नाहीत. अनुदानित आश्रमशाळेला ९०० रुपये देत असतो. अनुदानित शाळेत शिकणारी मुलेदेखील आदिवासी आहेत आणि शासकीय आश्रमशाळेत शिकणारी मुलेदेखील आदिवासी आहेत. त्यामुळे याबाबत असा दुजाभाव होऊ नये. अनुदानित आश्रमशाळांनादेखील अनुदान वाढवून द्यावे.

अनुसूचित जमातीच्या मुला मुलींसाठी अपर आयुक्त कार्यालयांतर्गत एकूण किती शासकीय वसतिगृहे आहेत? सदर वसतिगृहांमध्ये किती विद्यार्थी प्रवेशासाठी अर्ज दाखल करतात? त्यापैकी किती विद्यार्थ्यांना वसतिगृहात प्रवेश मिळतो व किती विद्यार्थी प्रवेशाविना वंचित राहतात, मुंबई, ठाणे व पुणे येथील शहरात किती वसतिगृहे असून तेथील विद्यार्थ्यांची क्षमता किती आहे, त्यांना कोणत्या शैक्षणिक सोयी सुविधा पुरविण्यात येतात? याबाबत माहिती देण्यास सांगितले असता, अपर आयुक्तांनी समितीस अवगत केले की, ठाणे विभागात एकूण ८९ वसतिगृहे आहेत. त्यापैकी ५१ वसतिगृहे मुलांची व ३८ वसतिगृहे मुलींची आहेत. मुलांची एकूण क्षमता ६१८५ आहे आणि मुलींची एकूण क्षमता ३७८० आहे. यावर्षी प्रवेश झालेली मुले ५७६१ आहेत आणि प्रवेश झालेल्या मुली ३०२० आहेत. एकूण ७९८१ अशी मुला मुलींची संख्या आहे. एका वसतिगृहाची मंजूर क्षमता ७५० आहे. ठाणे जिल्ह्यात ९७९० मंजूर प्रवेश क्षमता आहे. दरवर्षी प्रवेश घेणा-यांची संख्या बदलत असते.

यावर समितीने, विदयार्थ्यांची प्रवेश क्षमता ९७९० आहे. मात्र आता प्रवेश घेतलेल्या मुलामुलींची संख्या त्यापेक्षा कमी दिसत आहे, याचा अर्थ आपल्याकडे मागणी कमी आहे, वसतिगृहात प्रवेश क्षमता असतानाही पूर्ण प्रवेश झालेले नाहीत. त्यामुळे प्रवेशाचे अधिकार अपर आयुक्त, प्रकल्प अधिकारी यांना देण्यात यावेत. मोठ्या शहरात शिकण्यास आल्यावर राहण्याची सोय नसल्याने ते शिक्षणापासून वंचित राहतात. आपण प्रवेश क्षमता पाहिली तर किती तरी आदिवासी मुले प्रवेशापासून वंचित असल्याचे दिसत आहे. किमान आदिवासी विभागासाठी प्रकल्प अधिकारी व अपर आयुक्त यांना प्रवेशाचे अधिकार दिले पाहिजेत, जेणेकरून आदिवासी मुलांचे अर्ज ऑफलाईन ते भरू शकतील. मुंबई, पुणे, ठाणे येथे उच्च शिक्षणासाठी प्रवेश मिळतो, मात्र वसतिगृह मिळत नाही त्यामुळे विद्यार्थी पुन्हा ग्रामीण भागात जातात. मिरा-भाईंदरमध्ये असलेल्या वसतिगृहात राहून मुंबईतील शिक्षण घेऊ शकता येते.

शिक्षणाच्या दृष्टीने ग्रामीण भागातून शहराकडे मुले येतात. शहरातील वसतिगृहे दुर्दैवाने पूर्णपणे भरत नसतील तर शैक्षणिक धोरण कशा पद्धतीने राबविले जाणार आहे, याबाबत विचार केला पाहिजे. शिवाय ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही सोयीसुविधा मिळाल्या पाहिजेत. मात्र ग्रामीण भागातील आश्रमशाळा बंद करण्याचे धोरण राबविले जात आहे. आश्रमशाळांच्या संदर्भात शैक्षणिक धोरण आखले पाहिजे. आदिवासी मुलांना शिक्षणापासून वंचित ठेवणे बरोबर नाही असे समितीने मत मांडले.

समितीने, पंडित दीनदयाल स्वयंम योजनेत किती प्रवेश झाले आहेत असा प्रश्न केला असता अपर आयुक्तांनी सांगितले की, पं. दीनदयाल उपाध्याय स्वयंम योजनेत विद्यार्थ्यांचा प्रतिसाद कमी आहे. सदरहू योजनेच्या लाभार्थ्यांची संख्या केवळ ५ हजार इतकी अत्यल्प आहे. कार्यालयाकडे सदरहू योजनेंतर्गत लाभ मिळण्यासाठी केवळ ५६ अर्ज आले होते. यापैकी २६ अर्ज नामंजूर झाले आहेत. अर्ज नामंजूर होण्याचे मुख्य कारणे म्हणजे अर्जदाराकडे जात वैधता प्रमाणपत्र नसते. पूर्वीच्या शासन निर्णयान्वये या योजनेचा लाभ घेण्यासाठी जात वैधता प्रमाणपत्र बंधनकारक केले होते. परंतु आता जात वैधता प्रमाणपत्राच्या बाबतीत शिथिलता आणली आहे. नवीन निर्णयानुसार अर्ज करताना अर्जदारांकडे जात वैधता प्रमाणपत्र नसेल तरी त्यांचे अर्ज नामंजूर करता येणार नाही. ठाणे प्रकल्प कार्यालयांतर्गत या योजनेचा लाभ घेणा-या लाभार्थ्यांची संख्या केवळ दोन आकडी आहे. परंतु जव्हार, डहाणू, पेण या प्रकल्प कार्यालयांतर्गत लाभार्थी संख्या शून्य आहे. या योजनेसाठी लोकांचा प्रतिसाद अतिशय कमी असल्याने तालुकास्तरावर ही योजना

राबवावी, जेणेकरून लाभार्थी वाढू शकतील. सध्या ही योजना जिल्हास्तरावर राबविली जाते. तालुका स्तरावर स्वयंम योजना राबविण्यात यावी असा प्रस्ताव स्थानिक स्तरावरून अपर आयुक्तांकडे सादर करण्यात आलेला आहे.

समितीने, मुळात ऑनलाईन अर्ज कमी येतात म्हणून ऑनलाईन प्रकियेच्या माध्यमातून ज्या विद्यार्थ्यांना प्रवेश मिळाला नसेल त्यांना स्वयंम योजनेतून प्रवेश देण्याबाबत समितीच्या माध्यमातून स्वयंम योजनेच्या संदर्भात शिफारस करण्यात येईल असे आश्वासन दिले.

अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी राबवावयाच्या विविध योजना :

समितीने, ठक्करबाप्पा आदिवासी वस्ती सुधार योजना राबविण्याची प्रक्रिया काय आहे, लोकसंख्येच्या प्रमाणात कसे आणि किती टप्पे करण्यात आलेले आहेत याबाबत माहिती देण्यास सांगितले असता प्रकल्प अधिका-यांनी विदित केले की, ठक्करबाप्पा आदिवासी वस्ती सुधार योजनेचे एकूण तीन स्लॅब आहेत. पहिला टप्पा ५०० लोकसंख्येपर्यंतचा असून ५०० लोकसंख्येच्या गावात विकास कामे करण्यासाठी ७.५० लाख रुपये निधी देण्यात येतो. दुसरा टप्पा ५०१ ते १००० लोकसंख्येपर्यंतचा असून या दरम्यानच्या लोकसंख्येच्या गावात विकास कामे करण्यासाठी १२.५० लाख रुपये निधी देण्यात येतो. तिसरा टप्पा १००० पेक्षा जास्त लोकसंख्येचा असून अशा गावात विकास कामे करण्यासाठी २० लाख रुपये निधी देण्यात येतो. या योजनेंतर्गत कामे करण्यासाठी ग्रामपंचायतीकडून ठराव केला जातो. गट विकास अधिका-यांकडून त्या गावच्या लोकसंख्येचा दाखला प्रमाणित करुन घेतला जातो. त्यानंतर विभागाचे अधिकारी ज्या ठिकाणी काम करावयाचे असते तेथे प्रत्यक्ष भेट देऊन खरोखरच त्या ठिकाणी काम करण्याची आवश्यकता आहे किंवा कसे हे ठरवितात. या योजनेतून आवश्यकतेनुसार १३ कामे घेण्यात येतात. परंतु आता या कामांना प्रकल्प अधिका-यांची मान्यता घेतली जात नाही. पूर्वी या योजनेतून करावयाच्या कामाचा प्रस्ताव अपर आयुक्त, आदिवासी विकास विभाग यांच्याकडे जात होता. त्यांच्या स्तरावरून या कामांसाठी तत्वतः मान्यता घेण्यात येत होती. आता नवीन शासन निर्णय निर्गमित करण्यात आला असून त्यानुसार आता अपर आयुक्त, आदिवासी विकास विभाग यांच्याऐवजी जिल्हाधिकारी यांच्याकडे तत्वतः मान्यतेचा प्रस्ताव सादर करण्याचे नमूद केले आहे. त्यामुळे आता अपर आयुक्तांकडून नव्हे तर जिल्हाधिका-यांकडून ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधार योजनेच्या कामांना मान्यता देण्यात येते.

समितीने यावर, मुळात सदरहू योजनेच्या कामासंदर्भातील मान्यतेचा प्रस्ताव जिल्हाधिकारी यांच्याकडे न जाता तो पूर्वीप्रमाणेच अपर आयुक्त, आदिवासी विकास विभाग यांच्या स्तरावरूनच मान्य व्हावयास पाहिजे. वास्तविक पाहता ग्रामीण भागात गाव पातळीवर रस्ते, पाणी, वीज किंवा इतर तद्नुषंगिक छोट्याछोट्या गरजा ग्रामपंचायत स्तरावरून सोडविल्या गेल्या पाहिजेत म्हणून त्या ग्रामपंचायतीला ठक्करबाप्पा आदिवासी वस्ती सुधार योजनेच्या माध्यमातून गावातील अनेक वस्त्यां/पाड्यांमधील कामे हाती घेतली जातात. या योजनेतून केलेल्या कामांची गुणवत्ता तपासली जात नाही. अशा प्रकारे गुणवत्ता न तपासताा विक्रमगड तालुक्यातील सुकसाळे येथे ठक्करबाप्पा आदिवासी वस्ती सुधार योजनेतून १० लाख रुपयांचे रस्त्याचे काम झाले. परंतु एका वर्षात तो रस्ता पूर्णपणे उखडला आहे. अशा कामांची पडताळणी करून निधीचा दुरपयोग होणार नाही याची दक्षता संबंधित यंत्रणेने घेऊन चौकशी करावी. मुळात ठक्करबाप्पा आदिवासी वस्ती सुधार योजनेचा पैसा हा आदिवासी विकास विभागाचाच आहे. पूर्वी या योजनेच्या कामांना मान्यता देण्याचे अधिकार अपर आयुक्त स्तरावर होते. परंतु आता ते अधिकार जिल्हाधिका-यांकडे हस्तांतरित करण्यात आलेले आहेत. ठक्करबाप्पा आदिवासी वस्ती सुधार योजनेंतर्गत घेण्यात येणा-या कामांना मान्यता देण्याचे अधिकार नवीन शासन निर्णयानुसार अपर आयुक्त, आदिवासी विकास विभाग यांच्याऐवजी जिल्हाधिका-यांकडे देण्यात आलेले आहेत. याबाबत उक्त योजनेच्या कामांना मान्यता देण्याचे अधिकार जिल्हाधिका-यांना न देता पूर्वीप्रमाणेच अपर आयुक्तांनाच देणे उचित आहे, असे समितीने अभिप्राय मांडले.

समितीने, ठक्करबाप्पा आदिवासी वस्ती सुधार योजनेंतर्गत अपर आयुक्त स्तरावर एकूण किती निधी प्राप्त झाला, त्यापैकी किती निधी खर्च झाला आणि किती निधी अखर्चित आहे याबाबत माहिती देण्यास सांगितले असता अपर आयुक्तांनी विदित केले की, सन २०१४-१५ मध्ये ११९ कोटी ६७ लाख रुपये प्राप्त झाले होते आणि ११८ कोटी २९ लाख रुपये खर्च झाला आहे. सन २०१५-१६ मध्ये ११२ कोटी ३२ लाख रुपये प्राप्त झाले होते त्यापैकी १०९ कोटी ७४ लाख रुपये खर्च झाला. सन २०१६-१७ मध्ये ८७ कोटी ९९ लाख रुपये प्राप्त झाले होते त्यापैकी ८४ कोटी ४६ लाख रुपये खर्च झाला आहे. तसेच सन २०१७-१८ मध्ये ५९ कोटी ८८ लाख रुपये प्राप्त झाले होते. सदरहू निधीच्या खर्चाचा तपशील प्राप्त होणे बाकी आहे. एकंदरीत या आकडेवारीवरून असे दिसून येईल की, ठक्करबाप्पा आदिवासी वस्ती सुधार योजनेच्या निधीमध्ये दरवर्षी घट होत आहे.

पूर्वीच्या काळात काही योजना राज्यस्तरीय होत्या. परंतु आता त्या योजना जिल्हास्तरीय झालेल्या आहेत. अखर्चित निधी शासनाकडे समर्पित केला जातो. अखर्चित निधी हा बचत खात्यावर ठेवला जात नाही. तो निधी चालू खात्यावर ठेवण्यात येतो. अखर्चित निधी बाबत शासनस्तरावर कळविण्यात येते.

समितीने, पारधी विकास आराखड्याचे पॅकेज लागू झालेले आहे, त्या अनुषंगाने घरकुलांच्या व भूमिहिन शेतक-यांना शेतजमीन व विकासाच्या दृष्टीने ज्या योजना राबविल्या आहेत, त्याची सविस्तर माहिती समितीला सादर करण्यास सांगितले असता प्रकल्प अधिका-यांनी माहिती दिली की, पारधी विकास विशेष पॅकेजमधून सन २०१३ मध्ये २ लाख रूपये आले होते. आदिवासी विकासाच्या सर्व योजनांचा पारधी जमातीच्या लोकांना लाभ दिला जातो. शबरी घरकुलांचे लक्षांक सन २०१५-१६, सन २०१६-१७ यासाठी ५४१ होते, त्यापैकी पारधी समाजासाठी १८४ होते. सन २०१७-१८ मध्ये शबरी घरकुलांचे लक्षांक ५३१ होते. स्वाभिमान सबळीकरण योजनेंतर्गत औरंगाबाद प्रकल्पांतर्गत ४४०.२१ हेक्टर जमीन खरेदी करण्यात आली, त्यातील १८३.०८ हेक्टर जमीन लाभार्थ्यांना वाटप करण्यात आली, २५७ हेक्टर जमीन भूमिहिनांच्या नावावर करण्याच्या संदर्भात औरंगाबाद विभागीय आयुक्तस्तरावर चौकशी सुरू आहे.

समितीने, शबरी आदिवासी घरकुल योजनेंतर्गत मागील ३ वर्षांत किती निधीची तरतूद करण्यात आली आणि प्रकल्पनिहाय किती लाभार्थ्यांना पक्की घरे बांधून देण्यात आली आहेत, मुंबईतील आरे कॉलनीत राहणा-या आदिवासी समाजाला घरकुल वाटप करण्यात आले आहे काय, अशी विचारणा केली असता अपर आयुक्तांनी विदित केले की, सन २०१५-१६ साठी ५३ लाख रुपये आहेत. यावर समितीने ग्रामपंचायतींनी नव्याने ठराव करून पंचायत समितीकडे पाठविला पाहिजे आणि पंचायत समितीने डीआरडीएकडे दिले पाहिजे. पंतप्रधान आवास योजनेत फक्त ब व क कॅटेगरीतील लोकांना घरे मिळणार आहेत ड श्रेणीत असलेल्या आदिवासी बांधवांना घरकुल योजनेतून घरकुल मिळण्यास विलंब होतो. कारण ते प्राथम्य यादीत नाहीत. अपर आयुक्त यांनी ड श्रेणीतील आदिवासी बांधवाना घरकुल उपलब्ध करुन देण्यासाठी शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाच्या माध्यमातूनन जास्त निधी उपलप्रब्ध होऊ शकेल काय, याबाबत विभागाच्या सचिवांकडे विचारणा करावी असे स्पष्ट केले असता सर्व प्रकल्प अधिकारी व डीआरडीए यांच्याकडून माहिती घेण्यात येईल आणि पुढील व्यवस्था करण्यात येईल, असे अपर आयुक्तांनी सांगितले.

अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी राबवावयाच्या योजनांसाठी केलेल्या निधीच्या तरतुदीबाबतः

समितीने, सन २०१४-१५ ते २०१६-१७ या वर्षांत राज्याच्या अर्थसंकल्पात आदिवासींच्या कल्याणकारी योजनांसाठी अपर आयुक्त व प्रकल्पनिहाय आदिवासी उपयोजना व बाह्य क्षेत्रातील योजनांवर एकूण प्राप्त निधी व त्यापैकी झालेल्या खर्चातून मागील तीन वर्षात कोणकोणती कामे पूर्ण केली आहेत याबाबत माहिती देण्यास सांगितले असता अपर आयुक्तांनी विदित केले की, सन २०१४-१५ मध्ये राज्य योजनेचा नियतव्यय ५१२२२.५४ कोटी रुपये होता. यामध्ये ठाणे विभागाचा जिल्हा वार्षिक आदिवासी उपयोजनेचा नियतव्यय ६२०.३९ कोटी होता, यापैकी ५५४.३५ कोटी रुपये खर्च झाला असून खर्चाची टक्केवारी ८९.३५ टक्के आहे. सन २०१५-१६ मध्ये राज्य योजनेचा नियतव्यय ५४९९९.०० कोटी रुपये होता. या अंतर्गत ठाणे विभागाचा जिल्हा वार्षिक आदिवासी उपयोजनेचा नियतव्यय ६८४.१५ कोटी रुपये होता, यापैकी ६५७.३१ कोटी रुपये खर्च झाला असून खर्चाची टक्केवारी ९६.०७ टक्के आहे. सन २०१६-१७ मध्ये राज्य योजनेचा नियतव्यय ५६९९७.०० कोटी रुपये होता. यामध्ये ठाणे विभागाचा जिल्हा वार्षिक आदिवासी उपयोजनेचा नियतव्यय ७१६.०५ कोटी होता, यापैकी ७०७.८५ कोटी रुपये खर्च झाला असून खर्चाची टक्केवारी ९८.८५ टक्के आहे. हा निधी अपर आयुक्त, आदिवासी विकास विभाग स्तरावरुन प्रकल्प अधिकारी स्तरावर दिला जातो. हा निधी अपर आयुक्त, आदिवासी विकास विभाग यांच्या माध्यमातून प्रकल्प अधिकारी कार्यालयास वर्ग केल्यानंतर प्रकल्प अधिका-यांच्या माध्यमातून संबंधित यंत्रणांना तो वितरित केला जातो.

समितीने, त्यावर, अखर्चित रकमेच्या बाबतीत प्रकल्प अधिकारी ज्या यंत्रणांना निधी देतात त्यांच्याकडून उक्त निधीचा विनियोग कशाप्रकारे केला याची माहिती मागवित नाहीत. कार्यालयाकडून निधी वितरित केल्यानंतर आपली जबाबदारी संपली असे समजले जाते. एखाद्या यंत्रणेने रस्त्याच्या कामासाठी ४ कोटी रुपये मागितल्यानंतर प्रकल्प अधिका-यांकडून तेवढा निधी दिला जातो व आपली जबाबदारी संपली असे समजले जाते. वास्तविक पाहता यंत्रणांनी काम पूर्णत्वाचा दाखला आणला म्हणजे आपली जबाबदारी संपली असे समजता कामा नये. आर्थिक वर्षात प्राप्त झालेला निधी खर्च झाला पाहिजे. तसेच त्या आर्थिक वर्षात हाती घेतलेले काम पूर्ण झाल्याचा अहवाल प्राप्त करून घ्यावयास पाहिजे. या कामांचा आढावा घेते वेळी संबंधित यंत्रणांकडून काम सुरू असल्याचे सांगितले जाते, मात्र

प्रत्यक्षात काम पूर्ण होण्यास कित्येक वर्षे निघून जातात. कालांतराने लेखा परीक्षणाच्या वेळी या बाबी निदर्शनास येतात. त्यानंतर अखर्चित रक्कम समर्पित केली जाते. प्रकल्प अधिका-यांनी निधी दिल्यानंतर दर तीन महिन्यांनी त्या निधीचा विनियोग कोणत्या बाबीवर करण्यात आला याची पाहणी केली तर वितरित केलेल्या निधीचा विनियोग १०० टक्के योग्य प्रमाणात झाल्याचे निदर्शनास येईल. प्रकल्प अधिकारी कार्यालय स्तरावरून ज्या ज्या यंत्रणांना निधी वितरित करण्यात आलेला आहे त्या यंत्रणांकडून उक्त निधीच्या विनियोगासंदर्भातील आढावा दर तीन महिन्यांनी घ्यावयास पाहिजे. आदिवासी विकास विभागाच्या निधीचा विनियोग योग्य प्रकारे होण्याच्या दृष्टिकोनातून अशा प्रकारे आढावा घेण्याची कार्यवाही होणे आवश्यक आहे. अनेक वेळा काही ना काही कारणांमुळे मोठ्या प्रमाणात निधी शिल्लक राहतो. समितीने पालघर जिल्ह्याचा दौरा केला होता. त्यावेळी समितीच्या निदर्शनास आले होते की, सार्वजनिक बांधकाम विभागासाठी १०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती. परंतु त्यातील ५० टक्के निधी सुध्दा खर्च झालेला नव्हता यामागील मुख्य कारण म्हणजे नियोजनाचा अभाव होय. म्हणून ज्या कामासाठी निधी दिला जातो ते काम त्या त्या आर्थिक वर्षात केल्यास निधी शिल्लक राहणार नाही आणि तो समर्पित करण्याची वेळ सुध्दा येणार नाही, अशी सूचना समितीने केली.

यावर नियोजन अधिका-यांनी खुलासा केला की, आदिवासी विकास विभागाने सार्वजनिक बांधकाम विभागाला रस्ते विकासासाठी कोणताही निधी दिलेला नाही. आदिवासी विकास विभागाने जिल्हा परिषदेला निधी दिलेला आहे. जिल्हा परिषदेला आर्थिक वर्षात निधी खर्च करता आला नाही तर पुढील वर्षी तो खर्च करण्यास परवानगी आहे. तसेच एखाद्या कामाचा ठेका कमी रकमेचा झाल्यास तेवढी रक्कम वजा करून उर्वरित रक्कम अदा केली जाते. एवढेच नव्हे तर काम पूर्ण झाल्यानंतर काम पूर्णत्वाचा दाखला आणि काम पूर्ण झाल्याचे छायाचित्र बघूनच उर्वरित निधी दिला जातो. उदाहरणार्थ एखाद्या कामाला १० लाख रुपयांची प्रशासकीय मान्यता असेल तर त्या कामासाठी सुरुवातीला ६ लाख रुपये वितरित करण्यात येतात. सदरहू काम पूर्ण झाल्यानंतर ज्यावेळी उर्वरित ४ लाख रुपयांची मागणी होते त्यावेळी मागचे दायित्व किती आहे हे बघून उक्त कामावर नेमका किती खर्च झाला हे पाहून उर्वरित रक्कम अदा केली जाते.

अपर आयुक्त कार्यालय, ठाणे यांच्या अंतर्गत येणा-या विविध शासकीय आश्रमशाळांबाबतः

समितीने, ठाणे कार्यालयांतर्गत येणा-या प्रकल्प अधिका-यांनी त्यांच्याकडे शासकीय आश्रमशाळा किती आहेत, किती शासकीय आश्रमशाळांना नवीन इमारत व किती शासकीय आश्रमशाळा जुन्या इमारतींमध्ये आहेत तसेच किती आश्रमशाळा स्वतःच्या इमारतींमध्ये व किती आश्रमशाळा भाड्याच्या इमारतींमध्ये आहेत, किती वसतीगृहांच्या इमारतींची कामे सुरू आहेत, या संदर्भातील सविस्तर माहिती देण्यास सांगितले असता अपर आयुक्त, ठाणे कार्यालयातंर्गत येणा-या खालील प्रकल्प अधिका-यांनी आपल्या प्रकल्पाशी संबंधित पुढील प्रमाणे माहिती दिली. आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, पेण येथील १४ शासकीय आश्रमशाळा आहेत, त्यापैकी ११ शासकीय आश्रमशाळा शासकीय जागेत असून ३ आश्रमशाळांना शासकीय जागा नाही यामध्ये ३ शासकीय आश्रमशाळांचे बांधकाम सुरू आहे, ७ शासकीय आश्रमशाळांचे बांधकाम पूर्ण झाले आहे. पेण प्रकल्पातील साई, नांदवी व डोलीवली अशा ३ ठिकाणी भाड्याच्या इमारतींमध्ये शासकीय आश्रमशाळा सुरु आहेत. साई येथे रु.१८,७४३ भाडे असून, ९४४० चौ.मी.चा परिसर आहे., नांदवी येथे रु.४४,००० भाडे आहे, डोलीवली येथे रु.३५,४५१ भाडे आहे. तीनही ठिकाणी जागा मिळविण्याचे प्रयत्न सुरू आहेत. तसेच प्रकल्पातील १३ शासकीय वसतिगृहे आहेत, त्यापैकी २ वसतिगृह शासकीय इमारतीत आहेत, तर ११ ठिकाणी भाडे तत्वावरील इमारती आहेत.

आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय सोलापूर येथे ३ शासकीय आश्रमशाळा आहेत. त्यापैकी २ आश्रमशाळा शासकीय इमारतीत आहेत, तर १ भाड्याच्या इमारतीत आहे. तसेच ७ शासकीय वसतिगृहे आहेत, ती सर्व भाड्याच्या इमारतींमध्ये आहेत. यापैकी ४ वसतिगृहांना जागा मिळाली आहे, तर ३ वसतिगृहांच्या बाबतीत जागा मिळविण्याची प्रक्रिया सुरू आहे. या वसतिगृहात सोलापूर, बार्शी, नांदेड व उस्मानाबाद येथील मुले जास्त आहेत.

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी शहापूर यांनी विदित केले की, शहापूर प्रकल्पात २३ आश्रमशाळा आहेत, त्यातील १६ आश्रमशाळा शासकीय इमारतींमध्ये आहेत आणि ७ आश्रमशाळा भाड्याच्या इमारतींमध्ये आहेत. नवीन १२ आश्रमशाळांच्या इमारतींचे बांधकाम सुरू झाले होते. या १२ इमारतींपैकी ७ इमारतीची कामे पूर्ण झाली आहेत तर

५ इमारतीचे बांधकाम बाकी आहे. टाकीपठार येथील आश्रमशाळेचे विद्युतीकरण बाकी आहे. पेंढरघोळ आश्रमशाळेच्या प्लास्टरचे काम बाकी आहे, मोरोशीचे देखील मार्चपर्यंत काम पूर्ण होईल. अघई येथील वसतिगृहाचे काम पूर्ण झाले आहे. तसेच पिवळी आश्रम शाळेच्या ठेकेदाराची निविदा रद्द केली आहे.

समितीने, यावर एखादया आश्रमशाळेला अमुक रकमेचे काम देण्यात आले असेल ते काम ठराविक मुदतीत करणे क्रमप्राप्त आहे. काम त्या मुदतीत न केल्यामुळे वाढीव डीएसआरनुसार वाढीव रक्कम संबंधित एजन्सीकडून घेण्यात यावी असे मत मांडले.

घोडेगाव येथील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पात २३ आश्रमशाळा आहेत, १ आश्रमशाळा भाड्याच्या इमारतीमध्ये आहे, बाकी सर्व स्वतःच्या इमारतींमध्ये आहेत. त्यापैकी ५ आश्रमशाळांची बांधकामे सुरू आहेत. शाळेची इमारत व वसतिगृह काम अजून पूर्ण झालले नाही. त्याबाबतची कार्यवाही सुरू आहे.

डहाणू येथील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पात ३४ शासकीय आश्रमशाळा आहेत, त्यातील ३२ आश्रमशाळा शासकीय इमारतींमध्ये आहेत. तर ४ आश्रमशाळां भाडे तत्वावर आहेत. चळणे, उपलाट, रणकोळ इत्यादी ठिकाणी ४ आश्रमशाळांचे बांधकाम सुरू आहे.

जव्हार एकात्मिक आदिवासी प्रकल्पाच्या ३० शासकीय आश्रमशाळा आहेत, यातील ३ भाड्याचा इमारतींमध्ये आहेत, तर २७ आश्रमशाळा शासकीय इमारतींमध्ये आहेत. या २७ आश्रमशाळांपैकी १० शासकीय आश्रमशाळांचे बांधकाम सन २०१२ पासून सुरू असून ६ इमारतींचे बांधकाम पूर्ण झाले आहे. बांधकाम सुरू असलेल्या आश्रमशाळांपैकी गुहीर आश्रमशाळेच्या बांधकाम प्रकरणी कामगांराच्या पगाराची अडचण होती. परंतु आता १७ लाख रुपयांचे वेतन दिले आहे. साधारणतः मार्च २०१८ पर्यंत सदरहू आश्रमशाळेचे काम होईल. सूर्यमाळ आश्रमशाळेचे काम अर्थसंकल्पात समाविष्ट झाले नव्हते. त्यामुळे तरतूद करता आली नाही. पूर्वीच्या किंमतींच्या तुलनेत या कामाची किंमत आता दीड पटीने वाढलेली आहे. त्यामुळे आता सूर्यमाळ आश्रमशाळेच्या बांधकामाचे सुधारित अंदाजपत्रक करून त्या कामी नव्याने प्रशासकीय मान्यता घ्यावी लागेल.

अनुसूचित जमातीच्या उमेदवारांना देण्यात येणारे प्रशिक्षण व निधीबाबात :

समितीने, अनुसूचित जमातीच्या किती युवक-युवतींना दरवर्षी प्रकल्पनिहाय स्पर्धा परिक्षांचे प्रशिक्षण दिले जाते, अशी स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण केंद्र प्रकल्प कार्यालय, किंवा अपर आयुक्त स्तरावर सुरू केली आहेत काय, तसेच आदिवासी क्षेत्रात सांस्कृतिक भवनचे बांधकाम झालेले आहे काय अशी विचारणा केली असता अपर आयुक्तांनी विदित केले की, आदिवासी विकास विभागाच्या माध्यमातून अनुसूचित प्रवर्गासाठी मोठ्या प्रमाणावर योजना राबविण्यात येतात. आयुक्त स्तरावर स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण केंद्र सुरू केलेले नाही. तथापि, प्रकल्प अधिकारी कार्यालय स्तरावर अशी केंद्रे सुरू आहेत. हे खरे आहे अनुसूचित जमातीच्या प्रवर्गांसाठी स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण केंद्र सुरू करणे काळाची गरज आहे.

यावर समितीने, वास्तविक पाहता अनुसूचित जमातीच्या मुलांना स्पर्धा परीक्षांचे प्रशिक्षण देण्याकडे फारसे लक्ष दिले जात नाही. इतर जी स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण केंद्रे असतात त्यातून अनुसूचित जमातीची मुले प्रशिक्षण घेतात. अनुसूचित जमाती प्रवर्गातील मुलांसाठी स्वतंत्र स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण केंद्रे सुरू करणे आवश्यक आहे. यासाठी खास अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण केंद्र सुरु करण्याबाबतची शिफारस समितीच्या माध्यमातून करावयास पाहिजे. पालघर जिल्ह्यातील डहाणू, जव्हार, विक्रमगड किंवा ज्या ज्या ठिकाणी सांस्कृतिक भवन नाही त्या भागातील प्रकल्प अधिका-यांनी सांस्कृतिक भवन बांधकामाचा प्रस्ताव अपर आयुक्त, आदिवासी विकास विभाग यांच्याकडे सादर करावा. सांस्कृतिक भवन ही काळाची गरज असल्यामुळे प्रकल्प अधिकारी स्तरावर सांस्कृतिक भवन होणे आवश्यक आहे. त्या दृष्टिकोनातून आपण कार्यवाही करावी.

यावर प्रकल्प अधिका-यांनी खुलासा केला की, त्याशिवाय शहापूरला नुकतीच सांस्कृतिक भवनसाठी जागा उपलब्ध झालेली आहे. त्याशिवाय पेण प्रकल्पांतर्गत कशेडी गावात सांस्कृतिक भवन बांधण्याचा प्रस्ताव मागविलेला आहे. पण उक्त भवनाच्या बांधकामासाठी जवळपास १ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित असून अर्थसंकल्पात तरतूद केलेली नसल्याने चालू वर्षात ही रक्कम देता येणार नाही. उक्त रक्कम पुढील वर्षी उपलब्ध करुन देता येईल. सोलापूर प्रकल्पांतर्गत जुन्नरपासून २ कि.मी. अंतरावरील बारव येथे सांस्कृतिक भवन बांधण्यात आलेले आहे. यासाठी डीपीसीकडून १ कोटी ४० लाख रुपये निधी घेतला होता. उक्त सांस्कृतिक भवनाच्या वरच्या मजल्यावर स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण केंद्र सुरू केले आहे.

या व्यतिरिक्त डहाणूला क्रीडा संकुल प्रस्तावित आहे. या क्रीडा संकुलासाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केली आहे. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पालघर यांच्याकडे क्रीडा संकुलाचे डिझाईन मान्यतेसाठी सादर केले आहे.

कौशल्य विकास योजनेंतर्गत बेरोजगारांना कोणत्या प्रकारचे प्रशिक्षण देण्यात आले आहे, प्रशिक्षण घेतलेल्या लाभार्थ्यांपैकी किती बेरोजगारांना रोजगार व स्वयंरोजगार प्राप्त झाला आहे, सदर प्रशिक्षणार्थ्यांना व्यवसाय उभा करण्यासाठी अर्थसहाय्य दिले जाते काय, त्यासाठी किती निधी खर्च करण्यात आला अशी विचारणा केली असता समितीस पुढील माहिती मिळाली.

सोलापूर प्रकल्पांतर्गत सन २०१४-१५ मध्ये १७ लाख ५७ हजार रुपये तरतूद होती ही रक्कम खर्च करण्यात आली आहे. सन २०१५-१६ मध्ये १ कोटी १६ लाख रुपये तरतूद केली होती व ती सर्व खर्च करण्यात आली. या कौशल्य विकास योजनेंतर्गत जे उद्दिष्ट निश्चित केले होते ते पूर्ण झाले आहे. या माध्यमातून ७७ उमेदवारांना रोजगार उपलब्ध करुन देण्यात आला. या माध्यमातून बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करून दिला आहे. या योजनेंतर्गत उमेदवारांना प्रशिक्षण दिल्यानंतर त्यांना तांत्रिकी विभागात रोजगार उपलब्ध होऊ शकतो.

जव्हार प्रकल्प कार्यालयांतर्गत सन २०१६-१७ मध्ये ५ योजनांसाठी ८५ लाख रुपयांची तरतूद केली होती. सन २०१५-१६ मध्ये ज्या योजना घेतल्या होत्या त्यासाठी तरतूद नव्हती म्हणून उक्त वर्षातील कामे सन २०१६-१७ मध्ये घेतली आहेत. प्रशिक्षण संस्थेला वर्क ऑर्डर देत असताना उमेदवारांच्या प्रशिक्षणानंतर प्रशिक्षण संस्थांना उमेदवारांच्या सहा महिन्यांच्या पगार पावत्या सादर करण्याबाबत सांगितले आहे. उक्त प्रशिक्षण संस्थांनी उमेदवारांच्या पगाराच्या पावत्या सादर केल्यानंतर संस्थेला उर्वरित अनुदान वितरित करण्यात येईल.

डहाणू प्रकल्प कार्यालयांतर्गत अनुसूचित जमातीच्या उमेदवारांना डेटा एंट्री ऑपरेटरचे प्रशिक्षण देऊन त्यांना रोजगार उपलब्ध करून दिला आहे. डहाणू प्रकल्प कार्यालयासाठी ८ लाख १० हजार रुपये तरतूद होती. प्रशिक्षण संस्थेला ८ लाख १० हजार रुपये अदा करण्यात आले आहेत.

समितीने यानंतर मुळात या योजनेंतर्गत केवळ निधी खर्च होणे हा योजनेचा उद्देश नाही. वास्तविक पाहता या योजनेच्या माध्यमातून किती बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करून दिला या बाबतची माहिती मिळावयास हवी होती. समितीने किती बेरोजगार उमेदवारांना कौशल्य विकास योजनेच्या माध्यमातून रोजगार उपलब्ध करून दिला जातो असा मुद्दा उपस्थित केला होता. त्यानुसार समितीस माहिती उपलब्ध करून देणे गरजेचे आहे.

समितीने, विशेष केंद्रीय सहाय्य तसेच अनुच्छेद २७५ (१) अंतर्गत राबविण्यात येणा-या विविध योजनेसंदर्भात समितीला माहिती देण्यास सांगितले असता अपर आयुक्तांनी नमुद केले की, सन २०१४-१५ या वर्षासाठी घोडेगाव प्रकल्प कार्यालयासाठी ३९०.२५ कोटींची तरतूद केली होती. या तरतुदीपैकी ३१०.०८ कोटी रुपये खर्च झाला आहे. सन २०१४-२०१५ या वर्षी ३३४ उद्दिष्टे निश्चित केली होती आणि प्रत्यक्षात ३०८ इतके उद्दिष्ट साध्य झाले आहे. शहापूर प्रकल्प कार्यालयासाठी ३४१ कोटी रुपयांची तरतूद होती संपूर्ण रक्कम खर्च झालेली आहे. मागील तीन वर्षात प्रशिक्षणाची योजना सोडल्यास अन्य तिन्ही योजनांसाठी निधी आलेला नाही. विशेष केंद्रीय सहाय्य योजनेंतर्गत शहापूर प्रकल्प कार्यालयास सन २०१५-१६ पासून निधी आलेला नाही. विशेष केंद्रीय सहाय्यामध्ये घरकुल बांधकाम व मोगरा लागवड या योजना आहेत. मोगरा लागवड ही योजना आर्थिक उन्नतीसाठी महत्त्वाची ठरली आहे. एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प जव्हार जि. पालघर येथे मोगरा लागवडीची चांगली योजना सुरू आहे.

नामांकित इंग्रजी माध्यमांच्या शाळांबाबत :

समितीने, नामांकित इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये शासन निर्णयातील मार्गदर्शक सूचनेनुसार विद्यार्थ्यांना देण्यात येणा-या सोयी-सुविधा, मागील ३ वर्षांत प्रकल्पनिहाय किती शाळांमध्ये किती विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला आहे. त्यासाठी प्रकल्पनिहाय किती निधीचे वाटप करण्यात आले. सदर नामांकित आश्रमशाळांतील विद्यार्थ्यांना मिळणा-या शैक्षणिक सोयी सुविधांसंदर्भात नामांकित शाळांची तपासणी प्रकल्प स्तरावरून दरवर्षी केली जाते काय, याबाबात सविस्तर माहिती देण्यास सांगितले असता अपर आयुक्तांनी नमूद केले की, कार्यालयातर्फे तपासणी केली तेव्हा नामांकित इंग्रजी माध्यमांच्या शाळांत काही सोयी सुविधांचा अभाव होता म्हणून चार शाळांची मान्यता रद्द केली आहे. आता ठाणे विभागात कार्यरत असलेल्या सर्व शाळांमध्ये ९०-९५ टक्के भौतिक सुविधा उपलब्ध आहेत. विभागाच्या ब-याचशा इंग्रजी शाळा या आपल्या राज्य शिक्षण मंडळाच्या असतात.

समितीने यावर बहुतेक इंग्रजी शाळामध्ये शिकविणारे शिक्षक हे गुणवत्ताधारक नाहीत असे निदर्शनास आले आहे. एम.ए.मराठी शैक्षणिक पात्रता असलेले शिक्षक इंग्रजी लिटरेचर शिकवत आहेत ज्या उद्देशाने विद्यार्थी नामांकित इंग्रजी शाळांमध्ये जात आहेत तेथे शैक्षणिक पात्रताधारक शिक्षक नाहीत असे समितीच्या निदर्शनास आले आहे.

समितीने पुढे असेही निदर्शनास आणून दिले की, पाचगणी येथील रोझलँड इंटरनॅशनल या शाळेमध्ये आपल्या विद्यार्थ्यांसह खुल्या प्रवर्गातील विदयार्थ्यांना बसविले जाते की नाही याबाबत चौकशी करणे आवश्यक आहे. आपण या शाळांची निवड याकरिता केली आहे की, तेथील हुशार मुलांसोबत आपल्या आदिवासी विभागातील विद्यार्थ्यांचा गुणांक वाढावा. आपले विद्यार्थी नामांकित शाळांना द्यायला लागलो. यामुळे विभागाच्या शाळेतील पटसंख्या कमी व्हायला लागली. नामांकित इंग्रजी माध्यमाच्या शाळां त्यांचे आर्थिक गणित बसवितात. त्याचबरोबर आश्रमशाळा सोडून गेलेले शिक्षक तेथे काम करीत असताना दिसतात. असे असेल तर इंग्रजी माध्यमाच्या शाळा आपणच घेतल्या पाहिजेत. शिवाय या शाळांमध्ये पालकांना आपल्या मुलांना भेटू दिले जात नाही.

यावर अपर आयुक्तांनी खुलासा केला की, रोझलँड इंटरनॅशनल स्कूलचे नचिकेत स्कूल असे जूने नाव आहे. या शाळेची एकूण पटसंख्या ९२२ असून ७४८ विद्यार्थी आपल्या विभागाचे आहेत. म्हणजे १७४ विद्यार्थी बिगर आदिवासी आहेत. ही विद्यार्थ्यी संख्या मागील शैक्षणिक वर्षीची आहे. या वर्षी एक ही विद्यार्थी विभागाने त्यांना दिलेला नाही. वास्तविक ५०:५०% विद्यार्थी असे प्रमाण असले पाहिजे.

समितीने, सन २०१३-२०१४ मध्ये प्रकल्प कार्यालय पेण येथे १५-२० लाखांचा भ्रष्टाचार झाल्याच्या प्रकरणात प्रकल्प अधिकारी श्री. भोसले व निरीक्षक श्री. सोलसे यांना निलंबित केले आहे. पण त्यानंतर त्यांच्यावर कोणतीच कारवाई केलेली नाही असे निदर्शनास आणून दिले असता अपर आयुक्तांनी, प्रकल्प अधिकारी जव्हार व प्रकल्प अधिकारी शहापूर यांची चौकशी समिती स्थापन केलेली असून अहवाल आपल्या समितीकडे सादर करण्यात येईल. यामध्ये जवळपास १५-२० लोकांनी भ्रष्टाचार केलेला त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल. त्याचप्रमाणे पनवेल येथील वसतिगृहाचे अधीक्षक श्री. वळवी यांच्यावर तक्रारी आहेत. या अधिक्षकांवर ही कारवाई प्रस्तावित केली आहे.

विभागीय सचिवांची साक्ष :

समितीने, दिनांक २९ नोव्हेंबर,२०१७ रोजी ठाणे येथील अपर आयुक्त, आदिवासी विकास कार्यालयात बैठक घेतली होती, त्यानुंषगाने दिनांक १ नोव्हेंबर, २०१८ रोजी अपर आयुक्त, ठाणे कार्यालयासंदर्भात संबंधित विभागीय सचिवांची साक्ष घेतली.

पेसा अंतर्गत भरावावयाची पदे :

समितीने, विभागीय सचिवांच्या घेतलेल्या सदर साक्षीच्या वेळी सरळसेवेच्या ३६ पदांच्या जाहिरातीच्या संदर्भात उच्च न्यायालयात आव्हान दिले होते त्याची सद्यस्थिती काय आहे, स्थगिती उठविण्याच्या संदर्भात आपल्याकडून कोणते प्रयत्न करण्यात आले आहेत, याबाबत माहिती देण्यास सांगितले असता अपर आयुक्तांनी खालील माहिती दिली. दिनांक १८ फेब्रुवारी, २०१४ मध्ये २४८ पदांकरिता वर्तमानपत्रात एक जाहिरात दिली गेली होती. दिनांक ९ फेब्रुवारी, २०१४ मध्ये मा. राज्यपाल महोदयांचा पेसा क्षेत्राच्या अनुषंगाने अध्यादेश आला होता. पेसा क्षेत्राच्या अनुषंगाने जे शिक्षक व आदिवासी विकास निरीक्षक आहेत. त्यांची भरती स्थानिकामधून करावी. त्यानंतर या पदांसाठी दिनांक ५ जुलै, २०१४ रोजी परीक्षा झालेली आहे. दरम्यान दिनांक २६ जुलै,२०१४ रोजी मा. राज्यपालांच्या अध्यादेशानुसार १६१ नवीन शिक्षकांची भरती करण्याची जाहिरात दिली. त्याच्यानंतर दिनांक ५ सप्टेंबर, २०१४ रोजी निकाल घोषित केलेला आहे. तथापि, पेसा क्षेत्र आणि बिगर पेसा क्षेत्र या वादात दिनांक २६ जुलै, २०१४ रोजी दिलेल्या जाहिरातीस दिनांक २७ जानेवारी, २०१५ रोजी स्थगितीचे आदेश दिल्याने जानेवारी, २०१५ पासून शिक्षक व आदिवासी निरीक्षक पदांवर बंदी आली. दरम्यान शासनाच्या परवानगीसाठी प्रस्ताव पाठविला आहे विभागातील ४० पदे रिक्त आहेत, यांमध्ये ३२ शिक्षक व ०८ शिक्षकेतर पदे आहेत. या ३२ पदांच्या भरतीसाठी पवित्र पोर्टलचा वापर करण्यात येईल.

विभागाने सुरू केलेल्या मध्यवर्ती स्वयंपाकगृह योजनेबाबतः

समितीने, केंद्रीकृत पद्धतीने स्थापन केलेल्या स्वयंपाकगृहांमधून तयार केलेले अन्न किंवा जेवण विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याचे काम करणा-या विरुध्द काही ठिकाणी तक्रारी करण्यात आलेल्या आहेत. यासदंर्भात आपल्या विभागाने केलेल्या कार्यवाहीची माहिती देण्यास सांगितले असता, अपर आयुक्त, आदिवासी विकास ठाणे अंतर्गत येणा-या दिनांक २९ जुलै २०१५ रोजी कांबळगाव जिल्हा पालघर येथे केंद्रीकृत स्वयंपाकगृह दिनांक २९ जुलै, २०१५

रोजी सुरू करण्यात आले आहे. त्यामध्ये डहाणू प्रकल्पातील २३ आश्रमशाळा आणि जव्हार प्रकल्पातील ४ शाळा अशा एकूण २७ शाळांमधील सुमारे १२ हजार विद्यार्थ्यांना जेवण पुरविण्याचे काम करण्यात येते. या यंत्रणेवर नियंत्रण ठेवण्यासाठी नियंत्रण अधिकारी नेमण्याचे अधिकार अप्पर आयुक्तांना देण्यात आलेले आहेत. आदिवासी विकास प्रकल्प, डहाणू येथील श्री. उलहुले नियंत्रण अधिकारी आहेत.

तसेच मुंढेगावात मध्यवर्ती स्वयंपाकगृहामधून सध्या १५ आश्रमशाळांमधील ५,६०० विद्यार्थ्यांना जेवण पुरविण्याचे काम करण्यात येत आहे. त्यामध्ये सकाळचा नाश्ता, दुपारचे जेवण आणि रात्रीचे जेवण यांचा समावेश आहे. मध्यवर्ती स्वयंपाक गृहाद्वारे पुरविण्यात येणा-या जेवणाबाबत मुलांच्या तक्रारी होत्या की, त्यांना पुरविण्यात येणा-या चपात्या ह्या मशिनद्वारे बनविण्यात येतात आणि त्या कडक असतात. याबाबत टाटा ट्रस्ट यांना सूचना दिलेल्या आहेत की तंत्रज्ञानविषयक काही अडचण असेल तर ती शोधून त्यामध्ये सुधारणा करण्यात याव्यात किंवा परंपरागत पद्धतीने करता येत असेल तर तसे करण्यात यावे अशी आयुक्तांनी माहिती दिली.

शासकीय आश्रमशाळांच्या अपूर्ण राहिलेल्या बांधकामाबाबतः

समितीने, मिरा-भाईंदरला वसतिगृहाकरिता मिळालेल्या जागेवर बांधकामास सुरुवात झाली आहे काय असा प्रश्न केला असता, अपर आयुक्तांनी विदित केले की, मिरा-भाईंदरचे वसतिगृहाचे बांधकाम ई-निविदा स्तरावर आहे. त्या बांधकामाकरिता ११.०९ कोटी रुपयांची तांत्रिक मान्यता आहे. निविदा आल्यानंतर कार्यारंभ आदेश देऊन ते बांधकाम पूर्ण करण्यात येईल. या वसतिगृहात २०४ खोल्यांची क्षमता आहे. जी जागा मिळाली आहे, तेथे जास्त क्षमतेचे बांधकाम करून जास्तीत जास्त मुलांना सामावून घेण्याचा प्रयत्न करणे सुरू आहे. महापालिकेकडून जास्त एफएसआय मिळाला तर जास्त बांधकाम करण्याचा प्रयत्न आहे.

समितीने, शासकीय आश्रमशाळा पिवळी व गुहीर यासह अन्य ५ आश्रमशाळांच्या बांधकामासाठी सन २०१३ च्या आराखड्यात मान्यता देण्यात आलेली होती. सदर बांधकामांसाठी जी संस्था नेमण्यात आली होती तिला दोन कामे देण्यात आली होती. सदर संस्थेचे एका ठिकाणी काम चालू होते आणि दुस-या ठिकाणी फक्त कॉलम उभे करून ठेवले होते. सदर काम संबंधित संस्थेला ठरवून दिलेल्या कालावधीत पूर्ण केले नाही म्हणून संबंधित संस्थेवर कार्यवाही होण्यासाठी प्रस्तावित करण्यात आलेले आहे काय,

सदर प्रकरणी संबंधित संस्थेवर कार्यवाही करण्यात आलेली असेल तर काय कार्यवाही करण्यात आलेली आहे. याबाबत समितीला माहिती देण्यास सांगितले असता अपर आयुक्तांनी नमूद केले की, पिवळी आश्रमशाळेचे काम शाहीन इन्फ्रास्ट्रक्चर या संस्थेला देण्यात आले होते. संबंधित बांधकाम कंत्राटदाराचा सन २०१६ मध्ये मृत्यू झालेला आहे. अशा दोन आश्रमशाळांची बांधकामे होती त्यांच्या बांधकाम कंत्राटदारांचा मृत्यू झालेला आहे.

मुख्य अभियंता यांनी नमूद केले की, सदर बांधकाम हे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून करण्यात आले होते. माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये ते आपल्या विभागाकडे हस्तांतरित करण्यात आलेले आहे. ३० टक्के उक्त आश्रमशाळांचे फक्त बांधकाम पूर्ण झालेले आहे. तेही अतिशय निकृष्ट दर्जाचे झालेले होते. त्यामुळे सदर कामाचे स्ट्रक्चरल ऑडिट करून घेण्यात येत आहे. बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाल्याने उक्त आश्रमशाळांचे फक्त बांधकाम सदर बांधकाम तोडून टाकणे किंवा दुरुस्त करणे हा पर्याय आहे. आणि सदर प्रकरणी जो काही खर्च येणार आहे तो खर्च संबंधित कंत्राटदाराकडून वसूल करुन सदर बांधकाम पूर्ण करण्यात येईल. सदर बांधकाम हस्तांतरित करण्यापूर्वीच त्याची कालमर्यादा संपलेली होती. या बांधकामावर आतापर्यंत १ कोटी ७३ लाख रुपयांचा खर्च झालेला आहे. एकंदरित या ठिकाणी करण्यात आलेले बांधकाम योग्य रीतीने केलेले नाही.

उक्त प्रकरणी समितीने, जे बांधकाम सार्वजनिक बांधकाम विभागाला देण्यात आले होते त्या बांधकामाची तपासणी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून वेळच्या वेळी करण्यात आलेली नाही म्हणून सदरचे बांधकाम अतिशय निकृष्ट दर्जाचे झालेले आहे. बांधकाम हे एखाद्या विभागानेच करावे असे काही बंधन नाही केवळ त्या ठिकाणी आश्रमशाळा झाली पाहिजे ही लोकांची भावना विचारात घेऊन सदर काम आपण आपल्या विभागाकडे हस्तांतरित करून घेतलेले आहे. स्ट्रक्चरल ऑडिटचा अहवाल आल्यानंतर सदर बांधकाम पाडण्याची वेळ आली तर संबंधित संस्थेबरोबरच अभियंता, शाखा अभियंता, मुख्य अभियंता आणि कार्यकारी अभियंता हे देखील तितकेच जबाबदार असल्याने या सर्व संबंधितांवरसुद्धा दोषारोप ठेवून पुढील कार्यवाही करण्यात यावी. उपस्थित झालेल्या या प्रश्नाच्या अधीन राहून संबंधित आश्रमशाळेच्या बांधकामाच्या अनुषंगाने अपर आयुक्त आणि आयुक्तांनी स्वतः विशेष लक्ष घालून सदर प्रकरणाची शहानिशा आणि चौकशी करून दोषी अधिका-यावर योग्य ती कारवाई करण्यात यावी असे निदेशित केले असता मुख्य अभियंत्यांनी सदर बांधकामाचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्यासाठी एक महिन्याचा अवधी लागेल.

ऑडिट अहवालाच्या आधारे सदर प्रकरणाची शहानिशा करण्यात येईल असे समितीस आश्वासित केले.

अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समितीकडून देण्यात येणा-या पडताळणी प्रमाणपत्राबाबतः

अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, ठाणे या कार्यालयातील श्रीमती पुनम माने यांच्या कार्यकाळात जात पडताळणीसाठी श्रीमती सोनिया तुळशीराम कोळी यांचा एक प्रस्ताव दाखल करण्यात आलेला होता. ज्या विहित नमुन्यामध्ये प्रस्ताव सादर करावयाचा होता त्या नमुन्यामध्ये तो सादर करण्यात आलेला आहे. परंतू सदर अर्जावर संशोधन अधिकारी, उप संचालक, वरिष्ठ संशोधन अधिकारी, सह आयुक्त तथा उपाध्यक्ष यांपैकी कोणाच्याही स्वाक्षरी नाहीत. तरी देखील श्रीमती सोनिया कोळी यांना जात वैधता प्रमाणपत्र देण्यात आलेले आहे. सदर बाब माहिती अधिकारांतर्गत उघड झाल्यानंतर देण्यात आलेले जात वैधता प्रमाणपत्र तत्काळ रद्द करण्यात आलेले आहे, याबाबत समितीने स्पष्टीकरण मागितले असता सह. आयुक्तांनी विदित केले की, वैद्यकीय शिक्षणासाठी जात वैधता प्रमाणपत्राची मागणी करण्यात आलेली होती आणि विशेष मोहिमेंतर्गत त्यावेळेला प्रमाणपत्र देण्यासाठी वेळेची मर्यादा घालून देण्यात आलेली होती. सदर प्रमाणपत्र तयार करण्यात आले होते. परंतू प्रत्यक्षात ते प्रमाणपत्र देण्यात आले नव्हते. चुकीचा प्रकार घडल्याची बाब पडताळणी समितीच्या लक्षात आल्यानंतर लगेच ते अवैध ठरविण्यात आले. वैधता प्रमाणपत्र देण्याचे काम हे ऑनलाईन होत असल्यामुळे होटिंग झाल्यानंतर प्रमाणपत्र तयार करण्यात येते. लाभार्थ्याने कोणत्याही प्रकारचा लाभ सदर जात वैधता प्रमाणपत्राच्या आधारे घेतलेला नाही. संबंधिताचा वैद्यकीय प्रवेशदेखील रद्द झालेला आहे. या प्रकरणाची चौकशी आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेमार्फत करून त्याचा अहवाल समितीला सादर करण्यात येईल.

यावर समितीने, राज्य शासनाने विशेष मोहिमेंतर्गत जात वैधता प्रमाणपत्रासाठी बारकोड सिस्टिम आणली आहे. अगोदर असे चुकीचे प्रकार घडायचे, त्यामुळे ही बारकोड पध्दत आणली आहे. एवढया भक्कम प्रणालीला छेद देण्यात येत असेल तर ते योग्य नाही. बारकोड यंत्रणेलाही काही कर्मचारी संगनमत करून पोखरून काढत असतील तर

कारवाई करण्याच्या दृष्टीकोनातून आजच या गोष्टीची चौकशी करावी आणि संबधित चूक केलेल्या कर्मचा-यांवर तात्काळ निलंबनाची कारवाई करावी किंवा त्यांच्यावर फौजदारी खटला देखील दाखल करावा असे समितीचे म्हणणे आहे. अशा चुकीच्या पद्धतीने संचालकांच्या सह्या न करता प्रमाणपत्र देण्यात येऊ नयेत असे शासनाचे निदेश आहेत.

विभागाच्या अधिका-यांनी ही बाब गांभीर्याने घेऊन कोणत्याही परिस्थितीत या प्रकरणातील दोषींवर कारवाई करून समितीला अहवाल सादर करावा. तसेच या मुलीने या प्रमाणपत्राच्या आधारे घेतलेला लाभ त्वरीत काढून घ्यावा. दिनांक २३ मे २००१ च्या शासन निर्णयांच्या अनुषंगाने कारवाई करण्याबाबत समितीने निदेशित केले असता आयुक्तांनी स्पष्ट केले की, अतिशय नवीन कल्पना लढवून ऑनलाईन प्रणालीमध्ये अशा काही चुकीच्या घटना घडत असतील तर यामध्ये गांभीर्याने लक्ष घालून त्या दूर करणे यशस्वितेच्या दृष्टीने आवश्यक आहे. समितीच्या निर्देशाप्रमाणे राज्य स्तरावरून या संदर्भातील चौकशी करण्यात येईल.

अभिप्राय व शिफारशी :

आदिवासी विकास विभागाच्या शासकीय वसतीगृह व आश्रमशाळांमध्ये विदयार्थ्यांना पुरविण्यात येणा-या शैक्षणिक साहित्य, आरोग्य विषयक सुविधा, आश्रमशाळांतील फर्निचर,गाद्या, बँचेस व इतर साहित्य योग्य दर्जाचे नसल्याचे समितीने अनेक आश्रम शाळांना भेट दिली असता निदर्शनास आले आहे. वसतीगृह व आश्रम शाळांतील आरोग्यविषयक साहित्याचे प्रयोगशाळेतून तपासणी करणे आवश्यक आहे तसेच उपरोक्त साहित्याची निविदेद्वारे मागवावयाचे झाल्यास ठेकेदाराकडून पुरविण्यात येणारे साहित्य विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्या व शैक्षणिक दृष्टीने योग्य आहे किंवा नाही याची प्रकल्प अधिकारी कार्यालयाकडून वेळोवेळी तपासणी करण्यात यावी. यापुढे साहित्य निकृष्ट दर्जाचे आढळून आल्यास संबंधित ठेकेदारावर कारवाई करण्यात यावी असे समितीने अभिप्राय व्यक्त केले.

(१) अनुसूचित जमाती कल्याण समितीने केलेल्या पाहणी दौ-यांत विभागाच्या अनेक आश्रमशाळा बंद समायोजीत करून या शाळेतील विद्यार्थी नामांकित शाळेत पाठविण्यात येत असल्याचे समितीस आढळून आले राज्यातील अनेक नामांकित शाळांसह पाचगणी येथील रोझलँड इंटरनॅशनल शाळेमध्येही नामांकितचे निकष पूर्ण केले जात नाहीत. तेव्हा नामांकित

शाळेमध्ये असणा-या आदिवासी विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती, आरोग्यमान यामध्ये सुधारणा झाली आहे किंवा नाही याचा आढावा दर तीन महिन्यांनी आयुक्त कार्यालयातर्फे घेण्यात यावा या नामांकित शाळांचा दर्जा, शैक्षणिक सुविधा, आरोग्य विषयक सुविधा व या शाळांमध्ये नेमणूक केलेल्या शिक्षकांचा शैक्षणिक दर्जा, प्रयोगशाळा सहाय्यक व विज्ञानाचे शिक्षक इत्यादी निकषांचे परिक्षण न करता नामांकित शाळांना दर्जा देण्यात येत असल्याने मुलांच्या शिक्षणावर याचा विपरित परिणाम होत आहे. म्हणून या शाळांमध्ये उच्च दर्जाचे शिक्षण घेतलेले शिक्षक नियुक्त करणे गरजेचे आहे. काही शाळांमध्ये तर क्रीडांगणाची व खेळाच्या साहित्यांची सुविधा नसल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे. **सबब, नामंकित शाळांमध्ये शिकणा-या आदिवासी विद्यार्थ्यांची शैक्षणिक दर्जा, आरोग्यमान यासह सर्वांगिण प्रगती झाली आहे किंवा नाही याची दर तीन महिन्यांनी तपासणी करुन आढावा ध्यावा, तसेच शासकीय आश्रमशाळा बंद न करता आदिवासी विद्यार्थ्यांनी इतर विद्यार्थ्यांबरोबर स्पर्धेत टिकून राहावे यासाठी या आश्रमशाळांचा दर्जा वाढविण्यासाठी प्रयत्न करावेत. त्याचप्रमाणे विद्यार्थी संख्या कमी असल्यास त्या आश्रमशाळा समायोजित करून आदिवासी विकास विभागाने आपल्या खात्यामार्फत चालविण्यासाठी कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यात सादर करण्यात यावी अशी शासनास शिफारस आहे.**

आदिवासींसाठी राबविण्यात येणा-या विविध योजनांच्या निधीचा विनियोग करणेबाबत :

(२) जिल्हा परिषदेच्या अंतर्गत येणा-या विविध यंत्रणा व राज्य शासनाच्या जिल्हास्तरावर असणा-या यंत्रणांना आदिवासी विकास विभाग, केंद्र शासनाच्या विविध योजना तसेच चौदाव्या वित्त आयोगाकडून निधी उपलब्ध करुन देण्यात येतो. सदर निधीचा विनियोग जिल्हा परिषदेच्या व शासनाच्या विविध यंत्रणांनी योग्यरितीने करणे अपेक्षित आहे. तथापि, आदिवासीसाठी राबविण्यात येणा-या विविध योजनांवर करावयाचा खर्च पूर्णपणे न करता खर्च कमी करण्यात येतो. उर्वरित निधी म्हणजेच अखर्चित निधी संबंधित यंत्रणांकडे वर्षानुवर्ष तसाच ठेवला जातो. संबंधितांकडून निधी अखर्चित राहिल्यास त्यांनी तो निधी प्रकल्प अधिकारी वा अपर आयुक्त यांच्याकडे प्रत्यार्पित करणे गरजेचे आहे. उक्त निधी त्याच आर्थिक वर्षात संबंधित यंत्रणांकडून खर्च होऊन काम पूर्ण झाले आहे किंवा नाही याचा अहवाल प्राप्त करून घेणे आवश्यक आहे. ज्या कामासाठी निधी दिला जातो ते काम त्याच आर्थिक वर्षात पूर्ण केल्यास निधी शिल्लक राहणार नाही. परंतु यामध्ये

नियोजनाचा अभाव असल्याने निधी मोठ्या प्रमाणात अखर्चित राहतो. निधी उपलब्ध करून दिल्यानंतर त्या निधीचा विनियोग करण्याची सर्व प्रक्रिया संबंधित यंत्रणांकडून पार पाडली जाते किंवा नाही याची प्रकल्प अधिकारी किंवा अपर आयुक्तस्थरावरुन तपासणी केली जात नाही. याशिवाय विभागाकडून पुरविण्यात आलेला निधी संबंधित यंत्रणांकडून खर्च होतो की नाही याची तपासणी करण्यासाठी आदिवासी विकास विभागाकडे कोणतीही यंत्रणा उपलब्ध नसल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे. **आदिवासी विभागातर्फे दर तीन महिन्यांनी उक्त यंत्रणांनी केलेल्या कामांचा तसेच निधी खर्च झाला आहे किंवा नाही याचा आढावा घेणे आवश्यक आहे. सबब, जिल्हा परिषदेच्या यंत्रणा व जिल्हा स्तरावरील शासकीय यंत्रणा यांजकडून करण्यात येणा-या कामांवर त्या-त्या आर्थिक वर्षात निधी खर्च होऊन काम पूर्ण झाले आहे किंवा नाही याची तपासणी करून त्यावर देखरेख करण्यासाठी आदिवासी विकास विभागाकडून एक स्वतंत्र यंत्रणा निर्माण करून त्याबाबतचा अहवाल समितीस तीन महिन्यांत सादर करण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.**

(३) आदिवासी विकास विभागातर्फे चालविण्यात येणा-या वसतीगृहातील विद्यार्थ्यांना सर्वसाधारणपणे प्रत्येकी २,००० रुपये खर्च करण्यात येतो. तर अनुदानित आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांना ९०० रुपये देण्यात येतात. हा विरोधाभास असल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे. **याबाबत समितीची अशी शिफारस आहे की, अनुदानित आश्रमशाळातील विद्यार्थ्यांना जे अनुदान देण्यात येते ते पुरेसे नसून त्यामध्ये वाढ करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यात सादर करण्यात यावी.**

(४) अपर आयुक्त, आदिवासी विकास यांच्या अंतर्गत येत असलेल्या प्रकल्प कार्यालयामधील शासकिय आश्रमशाळा व वसतीगृहांच्या इमारती मोठ्या प्रमाणात भाडेतत्वावर असल्याचे तसेच विभागाच्या स्वतःच्या इमारतीचे बांधकाम अनेक वर्षांपासून प्रलंबित असल्याचे समितीस आढळून आले आहे. अशाप्रकारे अपर आयुक्त कार्यालयातंर्गत येणा-या जव्हार प्रकल्पातील बांधण्यात येणा-या गुहीर आश्रमशाळा व पिवळी येथील आश्रमशाळेच्या नवीन इमारतीचे बांधकाम दहा-दहा वर्षापासून प्रलंबित आहे. गुहीर येथील शासकीय आश्रमशाळेची समितीने माहिती घेतली असता बांधकाम सुरू असलेल्या नवीन इमारतीचे काम अतिशय निकृष्ट दर्जाचे असून जिन्यांस भेगा पडणे, छताला लोखंडाचा आधार दिला

असणे तसेच खिडक्या तुटलेल्या अवस्थेत असल्याचे निदर्शनास आले असून अजूनही किमान दोन वर्षे तरी काम पूर्ण होण्यास लागतील. **एवढ्या प्रदीर्घ कालावधी पासून शासकीय आश्रमशाळांच्या व वसतीगृहांच्या इमारतीचे बांधकाम प्रलंबित ठेवणे गंभीर बाब आहे. याशिवाय कामे करण्यास दिरंगाई करुन ठेकेदार वेळोवेळी निविदा दर वाढवून मागतात. त्यामुळे एका प्रकारे विभागावर खर्चाचा अतिरिक्त भार पडत असल्याने बांधकाम प्रलंबित असलेल्या आश्रमशाळा व वसतीगृह इमारतीचे बांधकाम मूळ निविदेच्या रक्कमेतच लवकरात लवकर पूर्ण करून देण्यास ठेकेदाराला आदेश देऊन संबंधित ठेकेदारांवर कठोर कारवाई करावी व त्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्यांत सादर करण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.**

(५) आदिवासी विकास विभागातर्फे अनुसूचित जमातीच्या उमेदवारासाठी स्पर्धा परीक्षा तसेच कौशल्य विकास योजनेंतर्गत प्रशिक्षण देण्याची योजना राबविण्यासाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून देण्यात येतो. यासाठी संबंधित यंत्रणांनी अनुसूचित जमातीच्या उमेदवारांना योग्य दर्जाचे प्रशिक्षण देऊन त्यांना स्पर्धा परीक्षेसाठी प्रोत्साहन देणे अपेक्षित आहे. **स्पर्धा परीक्षेसाठी लागणारी पुस्तके व तद्नुषंगिक साहित्य व प्रशिक्षण, अपर आयुक्त कार्यालय, ठाणे क्षेत्रातंर्गत येणा-या विविध संस्थांकडून देण्यात येत असल्याचे समितीस सांगण्यात आले. स्पर्धा परीक्षेसाठी लागणारी पुस्तके विद्यार्थ्यांना आश्रमशाळा तसेच वसतीगृहांमध्ये सहज उपलब्ध होतील यादृष्टीने प्रयत्न करावेत जेणे करुन मोठ्या प्रमाणात अनुसूचित जमातीचे विद्यार्थी शासकीय सेवेत अधिकारी पदावर नियुक्तीस पात्र ठरतील. तसेच परदेशी शिष्यवृत्तीसाठीही त्याचा उपयोग होईल. आदिवासी विभागातर्फे पुरविण्यात येणारी परदेशी शिष्यवृत्तीची रक्कम फारच तुटपुंजी असल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे. परदेशी शिष्यवृत्तीसाठी पाठवावयाच्या आदिवासी विद्यार्थ्यांची संख्या देखील कमी असते. म्हणून परदेशी शिष्यवृत्तीसाठी पाठवावयाच्या विद्यार्थ्यांची संख्या व अनुदानात शासनाने वाढ करावी अशी समितीची शिफारस आहे.**

(६) राज्यातील अपर आयुक्त, कार्यालयातंर्गत येणा-या प्रकल्प कार्यालयामधील प्रकल्प अधिकारी पदांवर पूर्ण वेळ प्रकल्प अधिका-यांची नेमणूक न करता त्याच्याकडे अतिरिक्त कार्यभार दिल्यामुळे अनेकदा समितीच्या बैठकीस सदर अधिका-यांना उपस्थित राहता येत नाही. उक्त अधिकारी भारतीय प्रशासन सेवेतील असल्याने त्यांना महसूल विभागाच्या

कामाचा देखील अतिरिक्त कार्यभार दिल्यामुळे विभागाचे कामकाज करणे अडचणीचे ठरत आहे. वास्तविक पाहता एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प हे आदिवासींसाठी राबवावयाच्या कल्याणकारी योजना व त्या योजनेद्वारे आदिवासीचा विकास व प्रश्न सोडविण्यासाठी स्थापन झाले आहेत. हा विभाग म्हणजे आदिवासींच्या जिव्हाळ्याचा भाग असून समितीने वारंवार ही बाब शासनाच्या निदर्शनास आणून दिली आहे. तरी देखील पूर्ण वेळ प्रकल्प अधिकारी पदांवर आय.ए.एस अधिका-यांची नेमणूक केलेली नाही. **सबब, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी कार्यालयातील प्रकल्प अधिका-यांची लवकरात-लवकर पूर्ण वेळ अधिकारी म्हणून नेमणूक करून केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यांत सादर करण्यात यावी अशी समितीची शासनास शिफारस आहे.**

(७) समितीने अपर आयुक्त कार्यालय, ठाणे येथे दिलेल्या भेटीच्यावेळी आदिवासीसाठी राबवावयाच्या ठक्करबाप्पा आदिवासी वस्ती सुधार योजनेच्या माध्यमातून गावातील अनेक वस्त्यां/पाडे यामधील कामे हाती घेतली जातात. परंतु त्यांची गुणवत्ता तपासली जात नसल्याचे समितीला आढळून आले आहे. अशाच प्रकारे गुणवत्ता न तपासता विक्रमगड तालुक्यातील सुकसाळे येथे ठक्करबाप्पा आदिवासी वस्ती सुधार योजनेतून १० लाख रुपये खर्च करून रस्त्याचे काम करण्यात आले होते परंतु एका वर्षात तो रस्ता पूर्णपणे उखडला आहे. याबाबत **समितीची अशी शिफारस आहे की, अशाप्रकारच्या पडताळणी न केलेल्या रस्त्यांची दक्षता संबंधित यंत्रणेने घेऊन चौकशी करून निधीचा दुरुपयोग करणा-या ठेकेदारावर शासनाने कारवाई करून केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यांत सादर करण्यात यावी.**

(८) शासकीय आश्रमशाळांच्या बहुतेक इमारती भाड्याने घेतलेल्या असल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे. **शासकीय आश्रमशाळा भाड्याच्या इमारतीत भरविण्यापेक्षा विभागाने स्वतःच इमारती बांधल्या तर शासनाच्या निधीची मोठ्याप्रमाणात बचत होऊ शकते. शासनाचा जेवढा निधी भाड्याच्या इमारतीवर खर्च केला जातो त्या खर्चामध्ये स्वतःच्या अनेक नवीन इमारती बांधल्या जाऊ शकतात. म्हणून शासनाने आश्रमशाळांसाठी भाड्याच्या इमारतीपेक्षा स्वतःच्या इमारती बांधण्याचा निर्णय घ्यावा व त्याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यात सादर करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

(९) आदिवासी विकास विभागाकडून कोणत्याही यंत्रणेला दिलेला निधी त्या संबंधित यंत्रणेकडून वेळेत खर्च करणे अपेक्षित आहे. समितीने पालघर जिल्ह्यास दिलेल्या भेटीच्यावेळी पालघर जिल्हा परिषदेने त्यांना दिलेला निधी दोन वर्षात खर्च न करता वर्षानुवर्षे अखर्चित ठेवल्याचे आढळून आले

आहे. जिल्हा परिषदेला दिलेला निधी दोन वर्षात शासनाकडे प्रत्यार्पित करणे किंवा खर्च करणे आवश्यक होते. **तथापि, पालघर जिल्हा परिषदेने त्यांना दिलेला निधी दोन वर्षा पेक्षाही अधिक वर्ष स्वतः कडे ठेवला आहे. सबब, पालघर जिल्हा परिषदेने दोन वर्षात निधी खर्च न करता निधी तसाच अखर्चित ठेवल्याने संबंधितांवर कारवाई करुन त्याबाबतची माहिती तीन महिन्यात सादर करण्यात यावी अशी समितीची शासनास शिफारस आहे.**

(१०) आदिवासी विकास विभागातर्फे शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना जेवण उपलब्ध करुन देण्यासाठी मध्यवर्ती स्वयंपाकगृहांची निर्मिती करण्यात आली आहे. या मध्यवर्ती स्वयंपाकगृहांतर्फे आसपासच्या आश्रमशाळांना पुरविण्यात येणारे जेवण वेळेत पोहचत असल्याने ते जेवण ताजे असते. परंतु काही आश्रमशाळा खूप दुरच्या अंतरावर असून त्या डोंगराळ भागात आहेत. त्यामुळे तेथे वेळेत जेवण पोहचविणे शक्य होत नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांना ताजे जेवण मिळत नाही. यासाठी पर्याय म्हणून शाळेच्या आसपासच्या गावातील महिला बचत गटांना जेवण पुरविण्याचे कंत्राट दिल्यास तेथील महिलांना रोजगार उपलब्ध होईलच, त्याचबरोबर शाळेतील मुलांना ताजे व गरम जेवण वेळेवर मिळण्यास मदत होईल. **म्हणून डोंगराळ भागातील आश्रमशाळांना जेवण पुरविण्याचे कंत्राट त्या त्या गावातील महिला बचत गटांना देण्याबाबतचा निर्णय घेण्यात यावा व त्याबाबत केलेल्या कार्यवाही माहिती समितीस तीन महिन्यात सादर करण्यात यावी. अशी समितीची शासनास शिफारस आहे.**

(११) अनुसूचित जमाती कल्याण समितीच्या दिनांक १ नोव्हेंबर, २०१८ रोजी अपर आयुक्त कार्यालय, ठाणे यांच्यासंदर्भात घेतलेल्या साक्षीच्या वेळी अनुसूचित जमाती जात पडताळणी समिती ठाणे, यांच्या कार्यालयातील कंत्राटी पद्धतीवर सेवेत नेमलेल्या श्रीमती पुनम माने यांनी श्रीमती सोनिया कोळी यांना चुकीच्या पद्धतीने जातवैधता प्रमाणपत्र देण्यात आल्याचे समितीच्या निदर्शनास आले होते. वास्तविक पाहता जातवैधता प्रमाणपत्र देताना समितीकडून एक विशिष्ट कार्यपद्धती अवलंबिण्यात येते. हे प्रमाणपत्र देताना अवलंबिण्यात येणारी प्रक्रिया व पासवर्ड गोपनीय स्वरुपाचा असतानाही श्रीमती पुनम माने यांच्याकडे देऊन गोपनीयतेचा भंग केला आहे. या चुकीच्या पद्धतीने देण्यात येणा-या वैधता प्रमाणपत्राबाबत कार्यालयातील तत्कालीन लिपिक, सदस्य सचिव तथा संशोधन अधिकारी व उपाध्यक्ष यांनीही श्रीमती पुनम माने यांना अप्रत्यक्ष सहकार्य केल्याचे निदर्शनास आले आहे. **सबब, याबाबत समिती अशी शिफारस करीत आहे की, श्रीमती पुनम माने यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करावा तसेच त्यांचे निलंबन करुन पुन्हा सेवेत घेऊ नये. तसेच याबाबत कसूर करणा-या व्यक्तींवर अन्य अधिका-यांमार्फत अथवा राज्य पातळीवरुन चौकशी पथक पाठवून योग्य ती कारवाई करुन त्याबाबतची माहिती समितीस तीन महिन्यांच्या आत सादर करावी.**

समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त

पहिली बैठक

अनुसूचित जमाती कल्याण समितीची बैठक दिनांक २९ नोव्हेंबर, २०१७ रोजी अपर आयुक्त, आदिवासी विकास कार्यालय, ठाणे येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालील सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते :—

उपस्थिती :

(१) प्रा. डॉ. अशोक उईके, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) डॉ. पंकज भोयर, वि.स.स.

(३) श्री. अमित घोडा, वि.स.स.

(४) डॉ. संतोष टारफे, वि.स.स.

(५) श्री. वैभव पिचड, वि.स.स.

(६) श्री. पांडुरंग बरोरा, वि.स.स.

(७) श्री. आनंद ठाकूर, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्री. राजेश तारवी, उप सचिव

(२) श्री. दामोदर गायकर, कक्ष अधिकारी.

विभागीय प्रतिनिधी :

(१) श्री. चंद्रकांत डागे, अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे

(२) श्री. सुदर्शन पी. नगरे, सहायक आयुक्त, ठाणे

(३) श्रीमती आर. व्ही. दाभाडे, उपसंचालक ठाणे

(४) श्री. शेख एम. ए. उपायुक्त, आदिवासी विकास विभाग, ठाणे

(५) श्री. भाऊसाहेब फटांगडे, सहायक आयुक्त (मावक), कोकण भवन

(६) श्री. आयुष प्रसाद, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी, घोडेगाव

(७) श्री. गजेंद्र केंद्रे, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी, पेण

(८) श्री. सि. ता. भालेकर, सहआयुक्त, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, ठाणे.

(९) श्री. आर. बी. पंढुरे, सहायक प्रकल्प अधिकारी, घोडेगाव

(१०) श्रीमती संगीता हुतवळे, सहायक प्रकल्प अधिकारी, डहाणू

(११) श्री. व्ही. आर. आव्हाडे, उप प्रादेशिक व्यवस्थापक,

(१२) श्री. एन. बी. खोंडे, उप व्यवस्थापक, शबरी आदिवासी विकास महामंडळ

उक्त बैठकीत समितीने अपर आयुक्त, आदिवासी विकास कार्यालय, ठाणे या कार्यालयातील अनुसूचित जमातीचे अधिकारी/कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण, अनुशेष व अनुसूचित जमातीच्या कर्मचा-यांची जात पडताळणी विषयक प्रकरणे तसेच अनुसूचित जमातीसाठी राबविण्यात येणा-या कल्याणकारी योजनांबाबत संबंधित अधिका-यांबरोबर चर्चा केली.

दुसरी बैठक

अनुसूचित जमाती कल्याण समितीची बैठक दिनांक १ नोव्हेंबर, २०१८ रोजी विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालील सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते :—

उपस्थिती :

(१) प्रा. डॉ. अशोक उइके, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. पास्कल धनारे, वि.स.स.

(३) डॉ. संतोष टारफे, वि.स.स.

(४) श्री. वैभव पिचड, वि.स.स.

(५) श्री. पांडुरंग बरोरा, वि.स.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्री. राजेश तारवी, उप सचिव

(२) श्री. संजय कांबळे, अवर सचिव (समिती)

विभागीय अधिकारी :

(१) श्री. किरण कुलकर्णी, आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक.

(२) श्री. संजय मीणा, अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे

(३) श्री. एल. जी. ढोके, उप सचिव, आदिवासी विकास विभाग

(४) श्री. सि. ता. भालेकर, सह आयुक्त, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र समिती कोकण विभाग, ठाणे.

(५) श्री. तुषार मठकर, सहायक आयुक्त (मावक), कोकण विभाग

(६) श्री. अरुणकुमार जाधव, प्रकल्प अधिकारी, शहापूर.

उक्त बैठकीत समितीने अपर आयुक्त, आदिवासी विकास कार्यालय, ठाणे या कार्यालयातील अनुसूचित जमातीचे अधिकारी/कर्मचारी यांची सरळसेवा भरती, बढती, आरक्षण, अनुशेष व अनुसूचित जमातीच्या कर्मचा-यांची जात पडताळणी विषयक प्रकरणे तसेच अनुसूचित जमातीसाठी राबविण्यात येणा-या कल्याणकारी योजनांबाबत संबंधित अधिका-यांबरोबर चर्चा केली.

तिसरी बैठक

अनुसूचित जमाती कल्याण समितीची बैठक दिनांक ११ जून, २०१९ रोजी विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालील सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते :—

उपस्थिती :

(१) प्रा. डॉ. अशोक उईके, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. पास्कल धनारे, वि.स.स.

(३) श्री. वैभव पिचड, वि.स.स.

(४) श्री. आनंद ठाकूर, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्री. जितेंद्र भोळे, सचिव (का.)

(२) श्री. राजेश तारवी, उप सचिव

(३) श्री. जयवंत राणे, अवर सचिव (समिती)

(४) श्री. दामोदर गायकर, कक्ष अधिकारी.

समितीने या बैठकीत प्रारुप अहवालावर विचार केला व तो आवश्यक सुधारणांसह संमत केला.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई